७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ११ मे २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १३५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# खरात प्रकरणात छोटे मासे समोर : पवार

**मुंबई (दै. संध्या)**



भोंदू अशोक खरात प्रकरणात सध्या केवळ छोटे मासे समोर आलेत. या प्रकरणात अनेक मोठे मासे आहेत. या प्रकरणाच्या तपासातून त्यांची नावे वगळण्यासाठी एक मोठे आर्थिक रॅकेट काम करत आहे, असा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी एकच खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या आरोपांमुळे या प्रकरणातील मोठे मासे कोण? असा प्रश्न चर्चिला जात आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणात आता सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची चौकशी सुरू झाली आहे. या चौकशीसाठी त्या सकाळीच नाशिक येथे दाखल झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी उपरोक्त दावा केला आहे. ते म्हणाले, भोंदू खरात प्रकरणात अनेक मोठे नेते, अधिकारी, व्यावसायिक अडकले असून त्या प्रकरणातील 1% सत्य देखील समोर आलेले नाही. समोर जे काही आले आहे ते केवळ छोटे मासे आहेत.

यामध्ये अनेक मोठे मासे देखील असून महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वात काळा अध्याय म्हणून हे प्रकरण नोंद होणार आहे. या प्रकरणाच्या तपासातून सुटका करून घेण्यासाठी किंवा नाव बाजूला काढण्यासाठी एक मोठे आर्थिक रॅकेट काम करत असल्याची माहिती समजत आहे. मोठमोठ्या रकमा घेऊन अनेकांना यातून अलगद बाहेर काढले जात आहे. ज्यांना या प्रकरणातून बाहेर काढायचे आहे त्यांना भोंदू विरोधात फसवणूक केल्याची तक्रार करायला सांगितले जाते आणि या प्रकरणातून बाहेर काढले जाते अशी ही पद्धती असल्याची माहिती आहे. या माहितीची शहानिशा करून गृहमंत्री महोदयांनी योग्य ती कारवाई करावी, ही विनंती, असे ते म्हणालेत. उल्लेखनीय बाब म्हणजे रोहित पवार यांनी यापूर्वीच अशोक खरात हा केवळ एक भोंदू नसून, एका मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांच्या जाळ्याचा भाग असल्याचा आरोप केला होता. ते म्हणाले होते, अशोक खरात हा केवळ भोंदू नाही. तो एका मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांच्या जाळ्याचा भाग आहे. ऑस्ट्रेलिया, दुबईसह 4-5 देशांमध्ये हवालाच्या माध्यमातून पैशांची उलाढाल करण्यात आली आहे. या व्यवहारांमध्ये केवळ वैयक्तिक फसवणूक नाही, तर भ्रष्ट अधिकारी आणि काही राजकीय नेत्यांचेही पैसे परदेशात पाठवले गेल्याची शक्यता आहे. हजारो कोटी रुपयांची रक्कम या मार्गाने बाहेर गेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत गंभीर असून त्याकडे केवळ एका गुन्हेगारी घटनेप्रमाणे न पाहता व्यापक आर्थिक आणि राजकीय संदर्भात तपास करण्याची गरज आहे, असे ते काही दिवसांपूर्वी म्हणाले होते. दुसरीकडे, रोहित पवार यांनी एका पोस्टद्वारे एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांच्या कथित भ्रष्टाचारावरही ताशेरे ओढले. ते म्हणाले, MMRDA विरोधात Systra या फ्रेंच कंपनीने केलेल्या तक्रारीची आणि आरोपांची चौकशी करुन 15 दिवसांत अहवाल देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये दिले होते. हा आदेश देऊन एक वर्ष झालं तरी अद्याप हा चौकशी अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही. या अहवालात MMRDA च्या काही अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराबाबत कठोर ताशेरे ओढण्यात आले असल्याचं बोललं जात असल्याने हा अहवालच दाबला जाण्याची शक्यता आहे. हा केवळ MMRDA चा विषय नाही तर राज्याच्या प्रतिमेचाही विषय आहे. या पार्श्वभूमीवर हा अहवाल सार्वजनिक करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आणि या अहवालाची प्रत देण्याची मागणी नगरविकास विभागाकडं केली. येत्या अधिवेशनात यावर विधिमंडळात आवाज उठवणार आहे.

## तामिळनाडूचे ९वे मुख्यमंत्री ‘विजय’

### पहिला आदेश : २०० युनिट मोफत वीज

**चेन्नई (दै. संध्या)**




'तमिळगा वेट्री कझगम' (TVK) चे प्रमुख आणि अभिनेता-राजकारणी सी. जोसेफ विजय हे तमिळनाडूचे नवीन मुख्यमंत्री बनले आहेत. त्यांनी तमिळ भाषेत शपथ घेतली. या शपथविधी सोहळ्यादरम्यान राहुल गांधी देखील उपस्थित होते.

शपथ घेत असताना, विजय यांनी ठरवून दिलेल्या मजकुरापलीकडील शब्द उच्चारण्यास सुरुवात केली; त्यावेळी राज्यपाल अर्लेकर यांनी त्यांना थांबवले आणि केवळ लेखी स्वरूपात उपलब्ध करून दिलेला मजकूरच वाचण्याची सूचना दिली. विजय यांच्यासोबत आणखी नऊ मंत्र्यांनी शपथ घेतली. यामध्ये एन. आनंद, अधव अर्जुन, डॉ. के.जी. अरुणराज, के.ए. सेनगोट्टैयन, पी. वेंकटरमणन, आर. निर्मलकुमार, राजमोहन, डॉ. टी.के. प्रभू आणि सेल्वी एस. कीर्तना यांचा समावेश आहे. हे सर्व आमदार विजय यांच्या 'टीव्हीके' (TVK) या पक्षाचे सदस्य आहेत. सद्यस्थितीत, विजय यांच्या पहिल्या मंत्रिमंडळात आघाडीतील मित्रपक्षांच्या एकाही आमदाराचा समावेश करण्यात आलेला नाही.

> मी, सी. जोसेफ विजय, भारताच्या संविधानाविषयी खरी श्रद्धा आणि निष्ठा बाळगेन. तामिळनाडूचा मुख्यमंत्री म्हणून, मी भारताची एकता आणि अखंडता अबाधित राहीन तसेच, मी माझ्या कर्तव्यांचे पालन करेन आणि माझ्या सदसद्विवेकबुद्धीनुसार व कायद्याला अनुसरून वागेन. मी कोणालाही घाबरणार नाही, तसेच कोणत्याही एकतर्फी आदेशांपुढे झुकणार नाही. मी न्याय देईन मी सर्व लोकांना न्याय देईन.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

## अशोक खरात प्रकरणात ४ मंत्र्यांचा थेट सहभाग : नाना पटोलेंचा दावा

**मुंबई (दै. संध्या)**



नाशिकच्या भोंदू अशोक खरात प्रकरणी काँग्रेस नेते नाना पटोले यांनी राज्यातील चार मंत्र्यांचा या प्रकरणात थेट सहभाग असल्याचा खळबळजनक दावा करत प्रकरणाला नवे वळण दिले आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी खरातला आधीच अटक करण्यात आली असून, प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. या प्रकरणातील काही आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आल्यानंतर राज्यात मोठी चर्चा झाली होती, मात्र आता पटोले यांनी थेट सत्ताधारी मंत्र्यांवरच निशाणा साधल्यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. नाना पटोले म्हणाले की, अशोक खरातकडून सगळी माहिती गोळा केल्यानंतर त्याला मारून टाकले जाईल. विधानसभेतही बोललो. या खरात प्रकरणात महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील 4 मंत्र्यांचा समावेश आहे. याबाबत पत्र सुद्धा आम्ही मुख्यमंत्र्यांना देणार आहोत. या चारही मंत्र्यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची आमची मागणी आहे. पुढे बोलताना नाना पटोले म्हणाले, महाराष्ट्रात कायदा सुव्यवस्था राहिलेली नाही. त्यामुळे राजकीय गुंड असतील किंवा भोंदू बाबा असतील हे समोर येत आहेत. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने हे सगळे घडत आहे. राज्यात भीती नावाचा प्रकार संपला आहे. त्यामुळे अशा घटना यापुढेही महाराष्ट्रात सुरू राहतील, असा आरोप पटोले यांनी केला आहे. दरम्यान, नाना पटोले यांच्या दाव्यानंतर अशोक खरात प्रकरणात गुंतलेले ते चार मंत्री कोण, यावरून राजकीय चर्चांना उधाण आले असून या प्रकरणाची व्याप्ती वाढताना दिसत आहे. स्वतःकडे दैवी शक्ती असल्याचा बनाव करून अनेक महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या खरातचे काळे कारनामे आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर चव्हाट्यावर आले, ज्यामुळे पीडित महिलांसह फसवणूक झालेले व्यावसायिकही आता तक्रारीसाठी पुढे सरसावले आहेत.

# रुपाली चाकणकर यांची एसआयटी चौकशी सुरू

### *पुण्याहून वकिलांसह नाशिकला पोहोचल्या; तपासात पूर्णपणे सहकार्य करण्याची ग्वाही*

**पुणे (दै. संध्या)**



राज्यभरात खळबळ माजवून देणाऱ्या अशोक खरात लैंगिक शोषण प्रकरणात आज एक महत्त्वपूर्ण वळण मिळाले. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांची नाशिकमधील विशेष तपास पथकाकडून कसून चौकशी सुरू आहे. या चौकशीसाठी चाकणकर पुण्याहून नाशिकला पोहोचल्या. त्यांच्या चौकशीतून आता या प्रकरणातील नेमकी कोणती गुपिते बाहेर येतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

नाशिकमध्ये चौकशीसाठी दाखल झाल्यानंतर माध्यमांनी रुपाली चाकणकरांना गराडा घातला. त्यामुळे त्यांनी आधी माध्यमांशी संवाद साधला. माध्यमांच्या प्रश्नांना त्यांनी अगदी शांतपणे उत्तरे दिली. त्या म्हणाल्या, SIT पथकाकडून याप्रकरणाचा जो तपास सुरू आहे, त्या संदर्भात त्यांचे काही प्रश्न असतील आणि त्यांना काही उत्तर हवे असतील तर ते देण्यासाठी मी आज नाशिकमध्ये आले आहे. एसआयटीला तपासात मी पूर्णपणे सहकार्य करेल. ती माझी जबाबदारी आहे. तपासाला सामोरे जात असताना जी - जी मदत पोलिसांना व तपास अधिकाऱ्यांना हवी असेल त्यांना मी ती करेल. कोण काय बोलत आहे याची मला कल्पना नाही. परंतु तपास पूर्ण झाल्यानंतर तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील.

पत्रकारांनी यावेळी त्यांना समता पतसंस्था आणि जगदंबा पतसंस्थेत असलेल्या अशोक खरातच्या बँक खात्यांशी तुमचा संबंध काय? असा प्रश्न केला असता त्यांनी ती सर्व खाती बनावट असल्याचा दावा केला. तसेच त्याचा अहवाल समोर येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. भोंदू अशोक खरात यांच्याशी संबंधावर आणि आरोपावर विचारले असता त्यावर चाकणकर म्हणाल्या, मला असे वाटते की अनेक शंका तुमच्या सगळ्यांच्या मनात आहेत. ज्यावेळेस हा तपास पूर्ण होईल, त्या तपासातूनच तुमच्या प्रश्नांना उत्तरे मिळतील. अंजली दमानिया यांनी या प्रकरणी केलेल्या आरोपांची आपल्याला कल्पना नाही.

पत्रकारांशी संवाद साधल्यानंतर रुपाली चाकणकर चौकशीसाठी नाशिकच्या महाराष्ट्र पोलिस ॲकडमी येथे पोहचल्या. तिथे आतमध्ये एका कार्यालयात त्यांची चौकशी सुरु आहे. माध्यमांनाही आतमध्ये प्रवेश नव्हता. त्यामुळे चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्या काय प्रतिक्रिया देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुख्य आरोपी अशोक खरातसोबतचे काही फोटो समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतर रुपाली चाकणकर यांच्यावर विरोधकांनी गंभीर आरोप केले होते. चाकणकर या खरातला आपला 'गुरू' मानत असल्याने त्यांनी यापूर्वीच्या काही प्रकरणांत राजकीय हस्तक्षेप केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी त्यांच्या राजीनाम्याची आक्रमक मागणी लावून धरली होती.

दरम्यान, अशोक खरात प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर 10:30 वाजता नाशिक येथे विशेष तपास पथकासमोर चौकशीसाठी हजर होणार आहेत. या महत्त्वपूर्ण प्रक्रियेसाठी त्या आपल्या वकिलांसह पुण्याहून नाशिककडे रवाना झाल्या असून, एसआयटी त्यांच्याकडून नेमकी कोणती माहिती मिळवते आणि या चौकशीतून काय निष्पन्न होते, याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

**पदाचा राजीनामा**

वाढत्या राजकीय दबावामुळे चाकणकर यांनी अखेर राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून, आजची ही चौकशी या प्रकरणातील पुढील दिशा ठरवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

**ढिंग-टांग**




## ब्रेकिंग न्यूज

### विवाह सोहळ्यानंतर तुंबळ हाणामारी

मुंबई (दै. संध्या) : वसई पश्चिमेकडील एका विवाहसोहळ्यात आनंदाच्या वातावरणाला हुंडा आणि देण्या-घेण्याच्या वादाचे गालबोट लागले आहे. किरकोळ वादातून सुरू झालेली शाब्दिक चकमक इतकी विकोपाला गेली की, दोन्ही पक्षांतील मंडळींनी एकमेकांवर अक्षरशः हल्ला चढवला. या राड्याचा 'लाईव्ह' व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, लग्नाचा मांडव जणू काही रणांगण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. याप्रकरणी माणिकपूर पोलिस ठाण्यात दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वसई पश्चिमेकडील स्वातंत्र्यवीर सावरकर क्रीडा संकुल परिसरात एका विवाहसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. लग्नविधी पार पडल्यानंतर हुंडा आणि देण्या-घेण्याच्या मुद्द्यावरून वधू आणि वर पक्षांमध्ये खटके उडण्यास सुरुवात झाली. काही वेळातच या वादाने हिंसक वळण घेतले आणि दोन्ही बाजूचे लोक एकमेकांवर तुटून पडले. या हाणामारीत काही जण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मारहाण करण्यासाठी काठ्या आणि इतर वस्तूंचा वापर करण्यात आल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

## उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांचा संशय; मतीन पटेलच्या घरावर बुलडोझर फिरणार

# संभाजीनगरहून मुली गायब होण्यामागे MIM?

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**




छत्रपती संभाजीनगर येथून मुली गायब होण्यामागे एमआयएमचा हात असल्याचा संशय सत्ताधारी शिवसेनेचे नेते तथा शहराचे उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी व्यक्त केला आहे. एमआयएमने धर्मांतर, लैंगिक शोषण व इतर गंभीर आरोप असणाऱ्यांना आश्रय दिला. त्यांची ही भूमिका असेल तर शहरातून बेपत्ता झालेल्या मुलींमागे एमआयएमचा हात आहे का? याची चौकशी झाली पाहिजे, असे ते म्हणालेत. त्यांच्या या आरोपामुळे शहराचे राजकारण चांगलेच तापले आहे.

टीसीएस प्रकरणातील आरोपी निदा खान हिला गुरुवारी रात्री छत्रपती संभाजीनगर येथून अटक करण्यात आली. ती एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनी खरेदी केलेल्या एका घरात बिनधोकपणे राहत होती. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट यांनी शुक्रवारी या प्रकरणाचा संबंध थेट एमआयएम नेते इम्तियाज जलील यांच्याशी जोडण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आता शिवसेना जिल्हाप्रमुख तथा संभाजीनगरचे महापौर राजेंद्र जंजाळ यांनीही या प्रकरणी एमआयएमला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. राजेंद्र जंजाळ म्हणाले, एमआयएमने धर्मांतर व लैंगिक शोषणासारखे गंभीर आरोप असणाऱ्या एका आरोपीला आश्रय दिला. त्यांची ही भूमिका असेल तर गंभीर गोष्ट आहे. छत्रपती संभाजीनगर येथून गत काही महिन्यांत अनेक अल्पवयीन मुली व महिला बेपत्ता झाल्या आहेत. अनेक पोलिस ठाण्यांत मिसिंगच्या तक्रारी दाखल आहेत. पण अद्याप त्यांचा शोध लागला नाही. मग यामागे एमआयएम आहे का? याची चौकशी झाली पाहिजे. एमआयएमनेही या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. हे प्रकरण केवळ निदा खानला आश्रय देण्यापुरते मर्यादित नाही. मतीन पटेलच्या मोबाईलमध्ये अनेक महिलांचे व्हिडिओ आहेत. या व्हिडिओच्या बळावर त्याने महिलांना ब्लॅकमेल केल्याच्या तक्रारी आहेत. एमआयएमच्या एका नगरसेवकावर 307 चा गुन्हा आहे. दुसऱ्या एका नगरसेवकाची मुंबईच्या ड्रग माफियासोबत भागीदारी आहे. एमआयएमचे लोक असे बेकायदा कामे करतात. ते गुन्हेगारांनाच आपल्या पक्षात घेतात व त्याला उमेदवारी देतात. मागच्या वेळीही एमआयएमचे काही गुन्हेगार नगरसेवक सभागृहात होते. एमआयएम हा गुंड व विघातक कृत्य करणाऱ्या लोकांचा पक्ष आहे, असे राजेंद्र जंजाळ म्हणाले. राजेंद्र जंजाळ यांनी निदा खान प्रकरणातील सहआरोपी नगरसेवक मतीन पटेल यांचे घर अनधिकृत असल्याचा दावा करत ते पाडण्यात येणार असल्याचेही स्पष्ट केले. मतीन पटेल यांचे कार्यालय व निदा खानला ज्या घरात लपवण्यात आले होते, ते घर अवैध व अनधिकृत आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम कायद्यानुसार महापालिका त्यावर कारवाई करेल. तशी नोटीस मतीन पटेल यांच्या घरावर लावण्यात आली आहे. या नोटीसीला उत्तर देण्यासाठी संबंधितांना 3 दिवसांचा अवधी देण्यात आला आहे. चौथ्या दिवशी मतीन यांच्या घरासह कार्यालयावर बुलडोझर चालवण्यात येईल, असे ते म्हणाले.

जंजाळ पुढे म्हणाले, निदा खान प्रकरण दिसते तेवढे सोपे नाही. पोलिसांनी या प्रकरणी तब्बल 9 एफआयआर दाखल केलेत. निदा खानला छत्रपती संभाजीनगरमध्ये आणून 40 दिवस लपवून ठेवले. त्यामुळे आरोपींनी या प्रकरणातील पुरावे नष्ट केल्याची शक्यता नाकारता येत नाही. असे कृत्य झाल्याचे स्पष्ट झाले तर पोलिसांनी सदर व्यक्तींवर कारवाई केली पाहिजे. ओवैसी व इम्तियाज जलील यांनी निदा खान व मतीन पटेल यांची पाठराखण केली.

## संतांकडे वाकड्या नजरेने पाहिले तर कार्यक्रमच होणार : नितेश राणे

**मुंबई (दै. संध्या)**



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते विकास लवांडे यांच्यावर शनिवारी शाई फेकण्याचा प्रकार घडला होता. संग्राम भंडारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून लवांडे यांच्यावर शाई फेकली होती. त्यानंतर अनेकांनी या घटनेचा निषेध केला. लवांडेंनी वारकरी संप्रदायाबाबत वादग्रस्त विधान केल्याने त्यांच्यावर शाइफेक करण्यात आल्याचे म्हटले जात आहे. यावर आता भाजप नेते व मंत्री नितेश राणे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संग्राम भंडारेंच्या केसालाही धक्का लागणार नाही, असे राणे यांनी म्हटले आहे.

नितेश राणे म्हणाले, या महाराष्ट्रात मोठी संत परंपरा आहे, वारकरी परंपरा आहे. आमच्या संत आणि महाराजांकडे कोणीही वाकड्या नजरेने बघत असेल तर त्या सगळ्यांचे कार्यक्रमच होणार, ही आमच्या सगळ्यांची भूमिका आहे. मला जशी ही बातमी समजली, मी बापूंना फोन केला आणि म्हटले की बापू चिंता करू नका, तुमचे सगळे भाऊ मंत्रालयात बसलेले आहेत. तुमच्या केसलाही धक्का लागणार नाही, हा मी बापूला शब्द देऊन टाकला. माझ्या नावाने शिव्या घालत असतील, मला काहीही फरक पडत नाही, असे राणे यांनी म्हटले आहे. नितेश राणे यांच्या या विधानानंतर विकास लवांडे यांनी देखील पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, माझ्यावर काल जो जीवघेणा हल्ला झाला, त्या संदर्भात फिर्याद देण्यात आली आहे, तरी देखील आरोपींना अटक झालेली नाही, त्यांच्या गाड्या जप्त करण्यात आल्या नाहीत, त्यांचे पिस्तूल जप्त करण्यात आले नाही. कारण या घटनेचे सूत्रधार आज बोलले आहेत, असे म्हणत त्यांनी राणे यांच्यावर निशाणा साधला आहे. पुढे बोलताना विकास लवांडे म्हणाले, संग्राम भांडारे हे प्यादा असावे आणि या घटनेचे सूत्रधार हे नितेश राणे असावेत. आता जर सरकारमधला मंत्रीच या हल्ल्याचा सूत्रधार असेल तर कोण कोणावर गुन्हा दाखल करणार आणि कोणाला अटक होणार असा प्रश्न माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पडतो. पोलिसांचे हात बांधलेले असावेत असे मला वाटते. आणि नितेश राणे याचे सूत्रधार आहेत. देवेंद्र फडणवीस याची दखल घेतील का? की त्यांना पाठिंबा देणार? असा सवाल लवांडे यांनी उपस्थित केला आहे.

# संपादकीय

# सोमनाथ : अखंड श्रद्धापर्व अन् महाराष्ट्राशी जडलेले अभेद्य नाते

गुजरातमधील सोमनाथ मंदिरावर मोहम्मद गझनीने १०२६ मध्ये सर्वप्रथम आक्रमण केले. हे आक्रमण धर्मयुद्ध तर होतेच, पण ती व्यापारमार्ग आणि सोमनाथमध्ये असलेल्या संपत्तीवर लक्ष केंद्रीत करणारी आक्रमक कारवाई सुद्धा होती.

सोमनाथावर झालेल्या प्रत्येक आक्रमणानंतर स्थानिक समाज, व्यापारी, साधू-संत, नंतर मराठा व पुढे स्वातंत्र्योत्तर नेतृत्व, कोणी ना कोणी नव्याने उभे राहिले आणि सोमनाथाचे संरक्षण केले. सोमनाथचा इतिहास प्रतिकार आणि पुनरुत्थान दोन्हींचा एकत्रित इतिहास आहे. सोमनाथ आणि महाराष्ट्राचे नाते भूगोलाने नव्हे, तर इतिहासाने जोडलेले आहे. मराठा साम्राज्याचा सोमनाथशी संबंध सांस्कृतिक, आर्थिक आणि सामरिक या तीन स्तरांवर आहे. सांस्कृतिक स्तरावर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हा सर्वात मोठा अध्याय. इंदूरच्या होळकर घराण्याची ही राणी, जी महाराष्ट्रातील मराठा राजवटीचा भाग होती, त्यांनी १७८३ मध्ये सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. भग्नावस्थेतील हे मंदिर त्यांनी पुन्हा उभे केले. समुद्राच्या लाटांच्या धक्क्यांपासून, तसेच भविष्यातील नौदल गोळीबारापासून संरक्षण मिळावे, म्हणून नवीन मंदिर थोडे आतल्या बाजूला उभे केले. हा निर्णय फक्त श्रद्धा म्हणून न बघता राज्यकारभारातील 'स्पेशल इंटेलिजन्स' म्हणून पाहिला तर अहिल्यादेवी होळकर यांचे दूरदर्शी नेतृत्व दिसून येते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी केवळ सोमनाथचेच पुनरुज्जीवन केले असे नाही तर काशी विश्वनाथाचे पुनरुज्जीवन, गया येथे घडवलेली कामे, द्वारकेतील मंदिरांचे सुशोभीकरण देखील त्यांनी केले. तडे गेलेली सभ्यता पुन्हा उभी केली. होळकर-शिंदे-भोसले अशा सरदारांची भूमिका यात महत्त्वाची होती. सोमनाथ हा त्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांचा एक महत्त्वाचा उपक्रम होता. आर्थिक स्तरावर, मराठ्यांनी सोमनाथ-वेरावल परिसराला तीर्थक्षेत्र म्हणूनच नव्हे, तर महसुली मालमत्ता म्हणूनही समजून घेतले. त्यामुळे सोमनाथच्या सुरक्षेवर खर्च करणे, किल्ले-ठाणी व रक्षक ठेवणे हे मराठा सत्तेसाठी भावनिकच नव्हे, आर्थिकदृष्ट्याही योग्य होते. सामरिक स्तरावर, सोमनाथ-काठियावाड हा भाग मराठा सत्तेसाठी पश्चिमेकडील बफर झोन होता. संपूर्ण मराठा इतिहासात गायकवाडांचा स्वतंत्र उल्लेख जरूरी आहे. मूळ महाराष्ट्रातून गेलेले हे बडोद्याचे सरदार गायकवाड यांनी गुजरातच्या काठियावाड परिसरावर दीर्घकाळ राज्य केले. त्यांच्या वतीनेच स्थानिक वतनदार, कारकून, पटेल-पटवारी या यंत्रणेने सोमनाथ व आसपासचा कार्यभार चालवला. सोमनाथचा रोजचा कारभार आणि मोठ्या निर्णयांचे वजनही, मराठा सत्तेच्या कक्षामध्येच राहिले होते. ईस्ट इंडिया कंपनीने १९ व्या शतकात मराठा साम्राज्य मोडीत काढण्यास सुरुवात केली, तेव्हा सोमनाथ परिसरातील देवस्थान जमिनी आणि महसूल हा करारांमधील महत्त्वाचा मुद्दा बनला. स्वातंत्र्यानंतर भारतात सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथ पुनर्बांधणीचा संकल्प केला. अशा धार्मिक स्मृती जपल्याच पाहिजेत असे त्यांचे आणि के. एम. मुन्शी यांचे आग्रही मत होते. यंदा 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा'ने याला नवा अर्थ दिला आहे. मोहम्मद गझनीने केलेल्या पहिल्या आक्रमणाला एक हजार वर्षे पूर्ण होत असताना, देशाने हा प्रसंग अखंड श्रद्धेचा महापर्व म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. गुजरात सरकार, केंद्र सरकार, अनेक सांस्कृतिक संस्था, साधू-संत, विद्वान, आणि सर्वसामान्य भक्त यांच्या सहभागातून हे स्वाभिमान पर्व आकाराला आले आहे. या पर्वानिमित्त देशभरातून यात्रेचे कार्यक्रम आणि दिल्लीपासून निघालेली स्वाभिमान यात्रा हेच दर्शवते की, सोमनाथ फक्त गुजरातचा विषय नसून तो देशाचा विषय आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सहभाग आणि नेतृत्व विशेष उल्लेखनीय आहे.

## संस्कृत सुभाषित

संक्षेपात् कथ्यते धर्मो । जनाः किम् विस्तरेण वः ।।
परोपकारः पुण्याय । पापाय परपीडनम्।।
अर्थ – सुभाषितकार म्हणतात, धर्मविषयक चर्चेचा उगाच विस्तार कशाला करू? धर्म थोडक्यात सांगतो, परोपकार हेच पुण्य व परपीडा हे पाप.

## आगामी साप्ताहिकी

११ मे २०२६ सोमवार
विठ्ठलानंद सरस्वती पुण्यतिथी – अमरावती
झिपरूअण्णा पुण्यतिथी – नासिराबाद (जळगाव)
शिवानंद केसरी महाराज पुण्यतिथी – छ संभाजीनगर
१२ मे २०२६ मंगळवार
पारशी दये मासारंभ
संत मुक्ताबाई पुण्यतिथी – मुक्ताईनगर (एदलाबाद)
१३ मे २०२६ बुधवार
अपरा एकादशई
पारनेकर महाराज वार्षिकोत्सव – पारनेर (अहिल्यानगर)
१४ मे २०२६ गुरुवार
प्रदोष
जनार्दनस्वामी पुण्यतिथी – काटोल व नागपूर
धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती (तारेखप्रमाणे)
१५ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
शिवरात्री
अगस्ती लोप
१६ मे २०२६ शनिवार
दर्श अमावास्या
भावुका अमावास्या
शनैश्चर जयंती
गोपाळ चैतन्य महाराज पुण्यथी – धारेश्वर
अमावास्या प्रारंभ पहाटी ५.११.
अमावास्या समापती उ. रात्रौ १.३१
१७ मे २०२६ रविवार
चंद्रदर्शन
करिदिन
गंगादशहरा प्रारंभ
पुरुषोत्तम–मल–अधिक ज्येष्ठ मासारंब

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९४५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | 4 | 9 | 6 | | | | 7 |
| 9 | | | | 4 | | 3 | | 1 |
| 3 | | | | | | | | |
| 5 | 9 | 3 | | 1 | 7 | | | 4 |
| | 1 | | 4 | | 6 | | 9 | |
| 2 | | | 8 | 3 | | 1 | 7 | 5 |
| | | | | | | | | 6 |
| 6 | | 1 | | 7 | | | | 9 |
| 7 | | | | 2 | 5 | 4 | | 8 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९४४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1 | 9 | 8 | 4 | 6 | 7 | 3 | 2 |
| 4 | 7 | 6 | 2 | 1 | 3 | 9 | 5 | 8 |
| 2 | 8 | 3 | 9 | 7 | 5 | 4 | 6 | 1 |
| 7 | 3 | 5 | 4 | 6 | 2 | 1 | 8 | 9 |
| 8 | 2 | 4 | 1 | 3 | 9 | 5 | 7 | 6 |
| 9 | 6 | 1 | 7 | 5 | 8 | 2 | 4 | 3 |
| 1 | 9 | 7 | 6 | 8 | 4 | 3 | 2 | 5 |
| 6 | 5 | 2 | 3 | 9 | 7 | 8 | 1 | 4 |
| 3 | 4 | 8 | 5 | 2 | 1 | 6 | 9 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ०३०३ – बायझेन्टाईन साम्राज्याची राजधानी बायझेन्टियम चे नोव्हा रोमा (नवीन रोम) असे नामकरण. कॉन्स्टेन्टिनोपल हेच नाव जास्त प्रचलित.
- १३१० – नाइटस ऑफ टेम्पलार या संघटनेच्या ५४ सदस्यांना फ्रांसमध्ये अधर्मी ठरवून जिवंत जाळण्यात आले.
- १८१२ – युनायटेड किंग्डमच्या पंतप्रधान स्पेन्सर पर्सिव्हालची हाउस ऑफ कॉमन्समध्ये हत्या.
- १८१८ – चार्ल्स चौदावा स्वीडनच्या राजेपदी.

### राष्ट्रीय

- १८५७ – पहिला भारतीय स्वातंत्र्य संग्राम – स्वातंत्र्यसैनिकांनी दिल्ली शहर जिंकले.
- १९९८ – भारताने राजस्थानमधील पोखरण येथे परमाणु बॉम्बची चाचणी केली.
- २००६ – प. बंगालमध्ये माकपाने सलग सातव्यांदा सत्ता मिळविली.
- २००७ – उत्तर प्रदेशात १६ वर्षानंतर बहुमताचे सरकार बनली.
- २००७ – बिहारच्या वैशाली जिल्ह्यात एक बस महात्मा गांधी पुलावरुन खाली कोसळल्याने २० जणांचा मृत्यू झाला.


### जन्म

- १७२० – कार्ल फ्रेडरिक हियेरोनिमस फ्राइहेर फोन मंचहाउसेन, जर्मन सेनाधिकारी व भटक्याचा जन्म.
- १८९५ – जे. कृष्णमुर्ती, भारतीय तत्त्वज्ञानीचा जन्म.
- १९७२ – जेकब मार्टिन, भारतीय क्रिकेट खेळाडूचा जन्म.

### निधन

- ९१२ – लिओ सहावा, बायझेन्टाईन सम्राटचे निधन.
- १३०४ – महमुद गझन, पर्शियाचा राजाचे निधन.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९४५



**आडवे शब्द**
१. इंद्रिय, गात्र
४. पुरी येथील श्रीकृष्णाचे नाव
७. उपयोग
१०. कागदी चलन
११. मसालेदार, खमंग
१३. दुलई
१५. कंबर
१६. काळ्या तोंडाचे माकड
१७. असंमती
१९. बडबड
२१. राग, चीड
२३. होडी चालवणारा
२५. अधाशीपणा
२७. माजलेला बैल
२८. स्तर, पापुद्रा
३०. काढलेली सुट्टी
३२. होडी
३२अ. पापणी न लावता
३४. रात्रीचा पाऊस
३६. घर
३७. मनाचा ओढा
४०. मालाची विक्री
४१. गव्हाची एक जात
४३. चकचकीत
४५. कमीजबरोबरचे वस्त्र
४७. सिगारेटचा झुरका
४८. देवळाचा मुख्य दरवाजा
४९. गोष्टी सांगणे
५१. संकुचित वृत्तीचा (ला.)
५२. लाकूड कापण्याचे हत्यार
५४. जंगलाचा राजा
५५. घोडे बांधण्याची जागा
५६. थडगे
५८. निर्हेतूकपणे, अनायास
६०. शंकराला वाहिले जाणारे फळ
६१. शिवाजीचा सैनिक
६३. अब्रू, प्रतिष्ठा
६४. परमेश्वर (हिंदी)
६५. उत्तीर्ण (इंग्रजी), जवळ (हिंदी)
६६. विचार, इच्छा
६७. हाणामारी
७०. साडेसातीत मधली अडीच वर्षे, दुर्दशा
७२. माफी मागणारा
७४. मोदकाचा 'कुकर'
७७. एक पालेभाजी
७८. मजल
७९. दयाळू, क्षमा करणारा
८०. विनंती
८१. सिनेमा

**उभे शब्द**
१. अपरिचित
२. कच्चे रेशीम धुताना निघणारा कचरा
३. पक्के आश्वासन
४. भुई
५. भूतकाळ
६. एकावर एक रचलेले
७. खराब
८. घोड्यावर मारलेली चक्कर
९. अंदाज, तर्क
१२. सुगंधी हिरवी पाने
१४. कफनाशक म्हणून उपयुक्त बीज
१८. जीभ
२०. धाक, भीती
२२. जपजाप्य
२४. अंकुर
२६. चटकन
२७. छोटे कुबड
२९. औषध
३१. जाग, जागेपणा
३३. कडक
३४. पूर्ण भस्मसात होणे
३५. चांगला
३८. मागणीचा हट्ट
३९. उद्ध्वस्त करणारे
४१. मनाला टोचणारे दु:ख
४२. भरभराट
४४. मोजकेपणा, मितता
४५. पुढे मागे सरकणारी गाठ
४६. समोरासमोरचे युद्ध
४७. अतिशय कटू
५०. पती
५१. खोडी
५३. अखबार
५५. स्वामी स्वरूपानंदांच्या समाधीचे गाव
५६. फुलाफळाचे शेत
५७. बोकड
५९. लई भारी
६०. कपाळ फुटणे
६२. कापड, वस्त्र
६३. परीक्षा घेणारा
६७. मृत्तिका
६८. फोटो
६९. विचारपूस
७१. वागणूक
७३. कारस्थान
७५. एक श्वासरोग
७६. फिरस्त्यांची राहुटी
७७. जल

### जम्बो शब्दकोडे क्र. ९४४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.परावलंबन ५.कद ७.घोडनवरा १०.रीस ११.फासेपारधी १५.ईश्वर १७.नात १८.रसा २०.पाणलोट २३.मना २५.वहाण २६.चर २७.गज २९.समय ३०.नाराज ३२.वचन ३४.हालहवाल ३६.कवायत ३८.पठार ४०.कारण ४२.टक ४३.ससा ४४.कमळ ४६.भार्या ४७.जिवाभावाचा ४९.समरस ५१.गाल ५२.हलवा ५४.मदरसा ५६.कायरस ५८.तवा ५९.जंगली ६०.सांब ६१.कात्री ६२.नवलविशेष ६५.पोतडी ६७.लावणी ७०.पार ७१.रया ७३.सरदार ७४.खटला ७६.रव ७७.नकलाकार ८०.हिरो ८१.खडाष्टक ८३.नकारघंटा ८६.खवीस ८७.थापेबाज ८८.टीचभर

उभे उत्तर : १.परीक्षा २.रास ३.लंकेश्वर ४.नफा ५.कपात ६.दर ८.डफ ९.वरण १२.सेनानायक १३.धीर १४.खेटर १९.सावज २०.पाणवठा २१.लोचन २२.मंगल कार्यालय २३.मम २४.विनायक २८.जहर २९.सल ३१.रात ३३.चरक ३५.वाणजिन्नस ३७.वाटचाल ३८.पसार ३९.घळ ४१.रंभा ४३.समकालीन ४५.मगर ४६.भागकार ४८.वाहवा ५०.समतल ५३.वाजंत्री ५५.सामिष ५७.रयत ५८.तबला ६१.काणी ६३.वगर ६४.शेवट ६५.पोरवडा ६६.डीर ६८.वशिला ६९.सौर ७०.पारखणे ७२.यान ७३.सरकार ७४.खरोखर ७५.लालसर ७८.कडबा ७९.कान ८२.कथा ८४.घंटी ८५.टाच

## उपदेशकथा

### विश्वासाचा सुगंध

चित्तरंजन हे अतिशय हुशार परंतु कट्टर नास्तिक गृहस्थ म्हणून सर्वजण त्यांना ओळखत. म्हणूनच सहदेव महाराजांच्या कीर्तनाला त्यांना आलेले पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटले. सहदेव महाराज तर धर्माची, ईश्वराच्या अस्तित्वाची महती सांगणारे. आणि अशा धार्मिक विषयाशी संबंधित कार्यक्रमाला चित्तरंजन कसे काय आले ? हे कसे काय शक्य आहे ? म्हणून सर्वत्र मित्र काहीसे अचंबितच झाले. त्यांच्यापैकी एकाला न राहवल्याने त्याने अखेर चित्तरंजन यांना विचारलेच, " भक्तिमार्गाची प्रवचने, कीर्तने ऐकायला जाणे आपल्याला पटते का ? आपल्या तत्त्वात ते बसते का ? नसेल तर आज येथे येण्याचे कारण काय ?"

चित्तरंजन म्हणाले, " त्याचे असे आहे की, सहदेव महाराज आपल्या प्रवचनात जे सांगतात, त्यावर माझा मुळीच विश्वास नाही. परंतु आपण जे जे बोलतो, त्यावर महाराजांचा दृढ विश्वास आहे. आणि ज्याचा स्वत:च्या बोलण्यावर दृढ विश्वास आहे, अशा व्यक्तीचे बोलणे समजून घ्यायला मला आवडते."

## : SMS :

Aasman per kaali
Ghata chayi hai
Aaj phir ghar wali
se maar khayi hai
Kehti hai sudher jao
lekin...kya karoon?
Kaam wali aaj
phir tayyar ho
kar aayi hai.

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग – पिवळा, शुभ दिशा – दक्षिण
वेळ मिळेल, प्रतिस्पर्धामुळे कामे पूर्ण होतील.

**तूळ :** शुभ रंग–लाल, शुभ दिशा–पूर्व
अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता.

**वृषभ :** शुभ रंग–पांढरा, शुभ दिशा–पूर्व
व्यापारामध्ये देणे – घेण्यावर समाधानी रहाल, कुटुंबियांवर लक्ष ठेवल्याने चांगला दिवस.

**वृश्चिक :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा–दक्षिण
व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल.

**मिथून :** शुभ रंग–काळा, शुभ दिशा–पश्चिम
आत्मविश्वासाने काम केल्यास त्याचे फळ निश्चित मिळेल. प्रतिष्ठा मिळण्याचे योग.

**धनू :** शुभ रंग – निळा, शुभ दिशा – पश्चिम
मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा.

**कर्क :** शुभ रंग–लाल, शुभ दिशा–पूर्व
दिवस चांगला जाण्याची शक्यता आहे. कामे योजनाबद्धतेने करा. परिश्रम आणि बुद्धीने कामे केल्यास फायदा होईल.

**मकर :** शुभ रंग – गुलाबी, शुभ दिशा – दक्षिण
मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल.

**सिंह :** शुभ रंग – गुलाबी, शुभ दिशा – पश्चिम
जास्त परिश्रमाने फायदा होईल. सामाजिक कार्यात भाग घेण्याचा योग आहे.

**कुंभ :** शुभ रंग – काळा, शुभ दिशा – पूर्व
आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

**कन्या :** शुभ रंग–निळा, शुभ दिशा–पूर्व
व्यावसायिक संबंध सुधारतील. नोकरी आणि राजकीय पक्षामध्ये विशेष बदल झाल्याने चालना वाढेल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : पूर्व
अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे – घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ – लालचे पासून दूर रहा.

## पंचांग

पंचांग
११ मे २०२६
सोमवार
विक्रम संवत्– २०८२
वैशाख शके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– वैशाख
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:नवमी १५:२४:४९
नक्षत्र:शतभिषा
२५:२८:२६+
योग:ऐन्द्र २५:०३:५३+
करण:गर १५:२४:४९
करण:वणिज
२७:१५:०८+
सूर्य:मेष
चन्द्र:कुम्भ
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – जिल्काद
तारीख – २४
विशेष
विठ्ठलानंद सरस्वती पुण्यतिथी – अमरावती
झिपरूअण्णा पुण्यतिथी – नासिराबाद (जळगाव)
शिवानंद केसरी महाराज पुण्यतिथी – छ संभाजीनगर

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८.२ | २८.२ |
| अहमदनगर | ३७.३ | २८.१ |
| अकोला | ४२.२ | २८.८ |
| अमरावती | ४०.७ | २६.३ |
| बीड | ४२.५ | २९.७ |
| भंडारा | ४२.८ | २६.६ |
| बुलढाणा | ३५.५ | २३.१ |
| चंद्रपूर | ४३.३ | ३०.४ |
| चेन्नई | ३७.३ | ३२.२ |
| नवी दिल्ली | ३५.७ | २४.७ |
| धुळे | ४०.५ | २८.८ |
| गोंदिया | ४०.५ | २५.२ |
| जळगाव | ४१.५ | २९.६ |
| कोल्हापूर | ३८ | २५.४ |
| लातूर | ३७.९ | २६.२ |
| मुंबई | ४०.८ | ३५.९ |
| नागपूर | ४१.३ | २६.१ |
| नांदेड | ४१.४ | २९.२ |
| नंदूरबार | ३९.२ | २९.५ |
| नाशिक | ३७.९ | २५.४ |
| पुणे | ३६.१ | २४.८ |
| पंढरपूर | ३९.६ | २६.७ |
| सातारा | ३७.७ | २५.१ |
| सांगली | ३९ | २६.३ |
| सोलापूर | ३९.७ | २९.६ |
| वर्धा | ४२.५ | २६.४ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### हापूस आवाक्यात; हंगामाच्या शेवटच्या टप्यातील आवक सुरु



पुणे (दैनिक संध्या) : कोकणातील हापूस आंब्याचा हंगाम शेवटच्या टप्यात आला असून, पुणे, मुंबईतील घाऊक बाजारात मोठ्या प्रमाणावर हापूस आवक होत आहे. आवक वाढल्यानंतर घाऊक आणि किरकोळ बाजारात दरात घट झाली आहे. हापूस सामान्यांच्या आवक्यात आला आहे. किरकोळ बाजारात एक डझन हापूसचे दर प्रतवारीनुसार ५०० ते ७०० रुपये दरम्यान आहे. हवामान बदलामुळे कोकणात हापूसच्या लागवडीत घट झाली. हंगामाच्या पहिल्या टप्यात हापूसचे डझनाचे दर साधारणपणे २००० ते २५०० रुपये होते. अक्षय तृतीयेला हापूसच्या मागणीत मोठी वाढ झाली होती. बाजारात मागणीच्या तुलनेत आवक कमी झाली होती. त्यामुळे एक डझन तयार हापूसला १८०० ते २००० रुपये असे दर मिळाले होते. सध्या कोकणातून मार्केट यार्डातील फळबाजारात आठ ते दहा हजार पेट्यांची दररोज आवक होत आहे, अशी माहिती मार्केट यार्डातील आंबा व्यापारी नितीन कुंजीर यांनी दिली. 'फळबाजारात हापूसची आवक वाढली आहे. हापूसचा हंगाम शेवटच्या टप्यात आला आहे. साधारणपणे आंब्याचा हंगाम २५ मेपर्यंत सुरू राहिल.

### सुनेच्या हत्येप्रकरणी फरार सासरा जेरबंद

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या नांदेड सिटी परिसरात सुनेची निर्घृण हत्या करून फरार झालेल्या सासऱ्याला अखेर जळगाव स्थानिक गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत. तब्बल आठ दिवस पोलिसांना चकवा देणारा आरोपी भानुदास भास्कर चौधरी याला जळगावमधील मेहरूण परिसरातून शिताफीने अटक करण्यात आली. २ मे रोजी नांदेड सिटी परिसरात ही थरारक घटना घडली होती. घरगुती वादातून संतापलेल्या भानुदास चौधरी याने आपल्या सून स्वाती तेजस चौधरी हिच्यावर डोक्यात वार करत तिची हत्या केली होती. धक्कादायक बाब म्हणजे, गुन्हा केल्यानंतर आरोपीने घराला बाहेरून कुलूप लावून घटनास्थळावरून पलायन केले होते. या प्रकरणी हवेली पोलीस ठाणे अंतर्गत नांदेड सिटी चौकीत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पुणे पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू असतानाच तो जळगाव शहरातील मेहरूण गाव परिसरात लपल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. माहिती मिळताच जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने सक्रिय झाले. मेहरूण येथील महादेव मंदिर परिसरात सापळा रचत पोलिसांनी आरोपीला अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले. फरार आरोपीला पकडण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईचे कौतुक होत आहे. अटक करण्यात आलेल्या भानुदास चौधरी याला प्राथमिक चौकशीनंतर पुढील तपासासाठी पुणे पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या हत्याकांडामुळे नांदेड सिटी परिसरात भीती आणि खळबळ निर्माण झाली असून कौटुंबिक वादाचे टोक किती भयावह असू शकते, याची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

### मसाज सेंटरच्या आड सुरु होता देहव्यापार; पोलिसांकडून 5 तरुणींची सुटका

पुणे (दैनिक संध्या) : पुण्यातील हडपसर परिसरात मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित देहव्यापार रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने (AHTC) शुक्रवारी (ता.८) केलेल्या धडक कारवाईत पाच पीडित तरुणींची सुटका करण्यात आली असून मसाज सेंटरच्या व्यवस्थापिकेला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हडपसर गाडीतळ परिसरातील वैभव थिएटर शेजारी असलेल्या 'एस.पी. बॉडी फिटनेस' या स्पा सेंटरवर ८ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कारवाई करण्यात आली. या ठिकाणी स्पा मॅनेजर तथा मालकीण आशा मुकेश गोरे (वय ५५, रा. हांडेवाडी, हडपसर) ही महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यापारासाठी प्रवृत्त करत असल्याचे समोर आले. तपासादरम्यान संबंधित महिलांकडून स्पाच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असून त्यातून मिळणाऱ्या पैशातून आरोपी स्वतःची उपजीविका भागवत असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी हडपसर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 143(1)(3) तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा 1956 अंतर्गत कलम 3, 4 आणि 5 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी महिलेला ताब्यात घेतले असून या रॅकेटमागील इतर संबंधितांचा शोध सुरू आहे. दरम्यान, या कारवाईमुळे हडपसर परिसरात मोठी खळबळ उडाली असून स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या बेकायदेशीर व्यवसायांवर पोलिसांनी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

### नसरापूर-चाकण अत्याचार पीडितेला 'मनोधैर्य'तून 10 लाखांची मदत

पुणे (दैनिक संध्या) : महिलांवरील अत्याचाराच्या घटनांनी समाजमन सुन्न होत असतानाच, पुणे सत्र न्यायालयाने पीडितेला न्याय मिळवून देण्यासोबतच तिचे आयुष्य पुन्हा सावरण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. नसरापूर आणि चाकण परिसरातील एका गंभीर अत्याचार प्रकरणातील पीडितेला राज्य सरकारच्या 'मनोधैर्य योजने'तून 10 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली आहे. ही या योजनेअंतर्गत दिली जाणारी आजवरची सर्वोच्च मदत मानली जात आहे. नसरापूर आणि चाकण भागात घडलेल्या या क्लेशदायक घटनेनंतर कायदेशीर लढाई न्यायालयात सुरू होती. मात्र, केवळ आरोपीला शिक्षा होणे पुरेसे नसून पीडितेला सन्मानाने जगण्यासाठी आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले. विशेष न्यायालयाने पीडितेची हलाखीची परिस्थिती आणि प्रकरणाची भीषणता लक्षात घेऊन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला ही रक्कम तात्काळ वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. बलात्कार, गंभीर लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ल्यातील पीडितांना सावरण्यासाठी सरकारतर्फे 'मनोधैर्य योजना' राबवली जाते. सहसा या योजनेतील मदतीचा आकडा मर्यादित असतो, मात्र या प्रकरणात सरकारी वकिलांनी पीडितेच्या भविष्यातील वाटचालीसाठी जास्तीत जास्त मदतीची मागणी लावून धरली होती. न्यायालयाने 10 लाखांची भरपाई मंजूर करून प्रशासनाला पीडितेप्रती असलेल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली आहे.

### बहिस्थ विद्यार्थी केंद्राचे दहावी, बारावीत यश

पुणे (दैनिक संध्या) : हडपसर येथील प्रथम शिक्षण मंडळाच्या बहिस्थ केंद्राचा दहावी-बारावीचा ९१ टक्के निकाल लागला आहे. ठिकठिकाणी काम करून वर्गाबाहेर अभ्यास करणाऱ्या या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाचे कौतुक होत आहे. प्रथम संस्था गेली २० वर्षे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी हडपसर, रामटेकडी, ग्रामीण भागात मुळशी, भिगवण व मावळ येथे प्रामुख्याने सहा ते १४ वयोगटातील मुलांसाठी वस्ती वाचनालय, अप्रगत मुलांचे वर्ग व १४ ते ३५ वयोगटातील अर्धशिक्षित व शिक्षणापासून वंचित महिला व मुलींना दहावी आणि बारावीचे शिक्षण देण्यासाठी बहिस्थ विद्यार्थी मार्गदर्शन व शिक्षण केंद्र चालवते. यंदा संस्थेतील एकूण ६५ विद्यार्थी १७ नंबर फॉर्म भरून दहावी व बारावीच्या परीक्षेला बसले होते. त्यातील ५९ मुले उत्तीर्ण झाली आहेत. त्यामध्ये अमृतेश कुलकर्णी (८०), तेजस पाटोळे (६४) यांनी चांगले यश प्राप्त केले. शिक्षण सोडल्यानंतर मोनिका कांबळे यांनी संसार सांभाळत तब्बल २४, तर रूपाली बेले यांनी २० वर्षांनी दहावी उत्तीर्ण होण्यात यश मिळविले असून आश्विनी पराठे, शुभांगी कांबळे यांनी या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.यातील बहुतांश विद्यार्थी गरीब व निराधार आहेत. मॉल, कंपनी, कापड दुकान, गॅरेज, भाजी विक्री आदी विविध ठिकाणी ते कामे करतात. संस्थेने त्यांना सकाळी १० ते चार या वेळेत अभ्यासाची सोय उपलब्ध करून दिली असून परिस्थितीवर मात करत स्वाभिमानाने जगण्याची धडपड व काही तरी करून दाखवण्याची जिद्द मनात ठेवून ही मुले शिक्षण घेत आहेत.

# पुण्यातील राजकीय पक्षाच्या शहराध्यक्षासह ९ जणांना बेड्या

पुणे (दै. संध्या)

हडपसर औद्योगिक वसाहतीत मध्यरात्री सुरू असलेल्या कॉपर केबल चोरीच्या मोठ्या रॅकेटचा वानवडी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत पर्दाफाश केला आहे. ड्रेनेज लाईनचे झाकण उघडून बीएसएनएलच्या भूमिगत मौल्यवान कॉपर केबल्स क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला पोलिसांनी रंगेहाथ पकडले. या धडक कारवाईत तब्बल ८० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून नऊ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.



सदरची कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उप-आयुक्त राजलक्ष्मी शिवणकर, सहाय्यक पोलीस आयुक्त नम्रता देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संगीता जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, शशीकांत लोंढे, पोलीस अंमलदार अमोल पिलाणे, महेश गाढवे, दया शेगर, गोपाळ मदने, अर्षद सय्यद, अभिजित चव्हाण, अमोल गायकवाड, विठ्ठल चोरमले, आशिष कांबळे, विष्णू सुतार, बालाजी वाघमारे, गणेश भुजबळ, वैभव निकम व हडपसर पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार बापू लोणकर, महावीर लोंढे यांच्या विशेष पथकाने केली आहे.

अस्लम सगीर खान (वय ३९, रा. तिलकनगर, दिल्ली), आरिफ कुंदुखाँ खान (वय ४०, रा. उत्तरप्रदेश), शोहेब हारुण खान (वय २५, रा. उत्तरप्रदेश), सलमान इद्रीस मलिक (वय ३३, रा. दिल्ली), नरेश कुमार श्रीशिवचरण (वय ४३, रा. हरियाणा), नवी मोहम्मद शान मोहम्मद (वय ३५, रा. उत्तरप्रदेश), अनिस अन्सारी मोहम्मद गियासुद्दीन (वय २२, रा. हडपसर, पुणे), अफाक अन्सारी रफिक अन्सारी (वय २२, रा. हडपसर, पुणे) आणि प्रवीण दादासाहेब बागुल (वय ३३, रा. हडपसर, पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हे शाखेच्या आदेशानुसार ८ मे रोजी रात्री ११ ते ९ मे रोजी पहाटे ३ वाजेपर्यंत वानवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोंबिंग आणि राऊंडअप ऑपरेशन सुरू होते. यावेळी पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख आणि त्यांच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत महत्त्वाची माहिती मिळाली. हनीवेल कंपनीजवळील आश्रय चहा हॉटेलसमोर काही संशयित इसम ड्रेनेज पाईपलाईनचे झाकण उघडून आत टाकण्यात आलेल्या कॉपर केबल्स क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढत असल्याचे समोर आले.

या माहितीच्या आधारे पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत लोंढे आणि त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत सापळा रचला. पोलिसांना पाहताच आरोपींनी पळण्याचा प्रयत्न केला.

मात्र, पोलिसांनी थरारक पाठलाग करत त्यांना जागीच जेरबंद केले. या कारवाईदरम्यान पोलिसांनी ३४ लाख ८० हजार रुपये किमतीची कॉपर केबल, ती चोरीसाठी वापरण्यात आलेली क्रेन, आयशर ट्रक, मोपेड आणि अन्य साहित्य असा एकूण ८० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या टोळीमध्ये दिल्ली, उत्तरप्रदेश, हरियाणा आणि पुण्यातील आरोपींचा समावेश असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, सरताज हुसेन (रा. फिरोजाबाद, उत्तरप्रदेश), अमन (रा. गोंडा, बिहार), तौफीक (रा. बदायूं, उत्तरप्रदेश), अली मोहम्मद ऊर्फ लल्लन (रा. ख्याला, दिल्ली) आणि अनिल देडे (रा. रामटेकडी, हडपसर, पुणे) या पाच आरोपींचाही या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. वरील सर्व आरोपींविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ६० आणि ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख करीत आहेत.

दरम्यान, अटक आरोपी प्रवीण बागुल हा वंचित बहुजन आघाडीच्या झोपडपट्टी सुरक्षा समितीचा पुणे शहराध्यक्ष असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच फरार आरोपी अनिल देडे याचाही संबंधित संघटनेशी संबंध असल्याने या प्रकरणाला राजकीय रंग चढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. फरार पाच आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांचे विशेष पथक त्यांच्या मागावर आहे.

## दहावीच्या विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला , चौघांवर गुन्हा दाखल

पुणे (दै. संध्या)

पुणे शहरालगतच्या फुरसुंगी परिसरात गुंडगिरीची धक्कादायक घटना समोर आली आहे. "मी इथला भाई आहे... माझ्यावर चार गुन्हे दाखल आहेत," अशी दहशत निर्माण करत चौघांनी मिळून दहावीच्या विद्यार्थ्यावर भररस्त्यात जीवघेणा हल्ला केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. हि घटना चंदवाडी रोडवरील कुस्ती आखाड्याजवळ ७ मे रोजी सकाळी साडेनऊ च्या सुमारास घडली आहे. आरोपींनी विद्यार्थ्याला काठ्यांनी बेदम मारहाण करत त्याचा मोबाईल फोडला आणि "आमच्याविरोधात तक्रार केली तर तुला जिवंत सोडणार नाही," अशी धमकी दिल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी तेजस कामठे (वय १६) या अल्पवयीन विद्यार्थ्याने फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार स्वप्नील भालेराव (वय १९), विवेक कामठे (वय १७), दादया खोमणे (वय १८) आणि एका १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलाच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११५(२), ११८(१), ३(५), ३२४(४), ३५१(३), ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तेजस कामठे हा शिवशंभो महादेव न्यू इंग्लिश स्कूल, फुरसुंगी येथे दहावीचे शिक्षण घेत आहे. ७ मे रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास तो दुचाकीवरून मांजरी येथे कामासाठी जात होता. चंदवाडी रोडवरील कुस्ती आखाड्याजवळून जात असताना आरोपी त्यांच्याकडील वाहनातून फुरसुंगीच्या दिशेने येत होते. तेजस त्यांना क्रॉस करून पुढे गेल्यानंतर आरोपींनी वाहन वळवून त्याचा पाठलाग सुरू केला. काही अंतरावर त्याला जबरदस्तीने थांबवण्यात आले. "तू आम्हाला कट का मारला?" असा जाब विचारत आरोपींनी त्याच्यावर शिवीगाळ सुरू केली. तेजसने आपण कोणालाही कट मारला नसल्याचे सांगितले असता आरोपी अधिकच आक्रमक झाले.

## मोक्का गुन्ह्यातील ८ महिन्यांपासून फरार आरोपी अखेर जेरबंद

पुणे (दै. संध्या)

**पुणे गुन्हे शाखेची मोठी कारवाई**





मोक्का कायद्यासारख्या गंभीर गुन्ह्यात तब्बल आठ महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला पुणे गुन्हे शाखेच्या युनिट-३ पथकाने सोलापूर जिल्ह्यातून शिताफीने अटक केली आहे. स्वतःची ओळख लपवून सांगोला तालुक्यात राहत असलेल्या आरोपीचा दोन दिवस पाठलाग करून पोलिसांनी ही धाडसी कारवाई केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव गुरूदत्त साळवे (वय ४४) असे असून तो निलेश घायवळ टोळीवरील मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुणे शहर गुन्हे शाखा युनिट-३ कडून ही कारवाई करण्यात आली. मा. अपर पोलीस आयुक्त पंकज देशमुख, पोलीस उपायुक्त विवेक मासाळ आणि सहायक पोलीस आयुक्त शैलेश संखे यांच्या मार्गदर्शनाखाली हे ऑपरेशन पार पडले. कोथरूड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपी गुरूदत्त साळवे याचा सहभाग असल्याचा आरोप आहे. भारतीय न्याय संहितेतील विविध गंभीर कलमांसह आर्म अ‍ॅक्ट आणि मोक्का कायद्यान्वये त्याच्यावर गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांनंतर तो गेल्या आठ महिन्यांपासून फरार होता. युनिट-३ मधील पोलीस हवालदार संदिप शेळके यांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध सुरू ठेवला होता. तपासादरम्यान आरोपी हा सांगोला तालुक्यातील निजामपूर परिसरात बनावट ओळख वापरून राहत असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर वरिष्ठांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक सोलापूरला रवाना करण्यात आले. पथकाने सलग दोन दिवस आरोपीच्या हालचालींवर गुप्तपणे नजर ठेवली. अखेर सांगोला तालुक्यातील निजामपूर गावातून आरोपीला शिताफीने ताब्यात घेण्यात आले. कारवाईनंतर सांगोला पोलीस ठाण्यात कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला पुण्यात आणण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर आरोपीला पुढील चौकशीसाठी गुन्हे शाखेकडे सुपूर्द करण्यात आले असून, कोथरूड पोलीस पुढील तपास करत आहेत.

गंभीर गुन्ह्यांतील फरार आरोपींविरोधात पुणे गुन्हे शाखेने आक्रमक मोहीम सुरू ठेवली असून, "गुन्हा करून पळून गेले तरी पोलिसांच्या हातातून सुटका नाही," असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, पोलीस उपआयुक्त विवेक मासाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश संख्ये यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत अन्नछत्रे, सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर ढवळे, पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे, सहाय्यक फौजदार पंढरीनाथ शिंदे, मुकुंद तारु, मारूती पारधी, पोलीस हवालदार अमोल काटकर, संदिप शेळके, हनिफ शौकत शेख, पोलीस हवालदार कैलास लिम्हण, अतुल साठे, महेंद्र तुपसौंदर, सहाय्यक फौजदार अर्चना वाघमारे, पोलीस हवालदार अनुष्का जगदाळे, पोलीस अंमलदार पुरुषोत्तम गुन्ला, योगेश झेंडे, तुषार किंद्रे, पोलीस हवालदार विपुन गायकवाड याच्या पथकाने केली आहे.

# पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रोखणार – आमदार रोहित पवार

पुणे (दै. संध्या)

"दोन दिवसांत आरोपींना बेड्या ठोकल्या नाहीत, तर पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला जाईल," असा थेट इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) चे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर आळंदी म्हातोबा (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास संग्राम भंडारे व अक्षय कांचन (रा. उरुळी कांचन, ता. हवेली) तसेच इतर 10 ते 12 जणांनी वाहनाचा पाठलाग करत गाडी अडवली. त्यानंतर त्यांच्या अंगावर काळी शाई फेकण्यात आली तसेच धक्काबुक्की करण्यात आली. दरम्यान या घटनेच्या निषेधार्थ लवांडे यांची भेट घेण्यासाठी व आरोपींवर कारवाई करण्यात यावी. यासाठी रोहित पवार लोणी काळभोर येथील पोलीस ठाण्यात लवांडे यांची भेट घेऊन प्रसार माध्यमाशी संवाद साधला यावेळी रोहित पवार बोलत होते.



यावेळी बोलताना रोहित पवार यांनी अनेक गंभीर आरोप केले. "विकास लवांडे यांना काही दिवसांपूर्वी दोन जणांनी बंदूक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली होती. या टोळीत तो 'भंडारी' नावाचा बोंदू महाराज आणि कांचन नावाचा सराईत गुन्हेगार सामील आहे," असा खळबळजनक दावा त्यांनी केला आहे. या गुन्हेगारांवर तातडीने कडक कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. पोलिसांनी याप्रकरणी कडक कलमे लावून गुन्हेगारांना ताब्यात घेण्याचे आश्वासन दिले आहे. "आम्ही पोलिसांच्या वर्दीचा आदर करतो, म्हणून त्यांना दोन दिवसांचा वेळ दिला आहे. जर दोन दिवसांत काही ठोस कारवाई झाली नाही, तर सोलापूर नॅशनल हायवेवर सकाळी 10 ते 11 च्या दरम्यान चक्का जाम आंदोलन केले जाईल," असेही रोहित पवार यांनी ठणकावून सांगितले. विकासभाऊंनी आधीच निर्णय घेतला होता. की इथं मी आंदोलन करणार हे आंदोलन करणार. जोपर्यंत तो भंडारी भोंदू बाबा भोंदू महाराज जो आहे. त्याला ताब्यात घेत नाही तोपर्यंत मी इथं बसून राहणार. आम्ही त्यांना विनंती केली की दोन दिवस आपण पोलिसांना वेळ देऊया.

आणि जर दोन दिवसात काही नाही झालं तर आम्ही अजून एक पत्र दिलेलं आहे. वारकरी संप्रदायाचा वारंवार अवमान करणाऱ्या आणि संतांबद्दल आक्षेपार्ह विधाने करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध आता पुण्यात रणशिंग फुंकले गेले आहे.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये आता 'शिपाई' मिळणार?

## ग्रामीण शाळांच्या व्यवस्थापनात होणार मोठा बदल

पुणे (दै. संध्या)

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील स्वच्छता, दैनंदिन व्यवस्थापन आणि पूरक कामकाजाच्या वाढत्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद शाळांमध्ये शिपाई पदाची आवश्यकता तपासून तातडीने कार्यवाही करावे. असे आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण शिक्षण व्यवस्थेमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुणे जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडून जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांना याबाबत अधिकृत पत्र पाठवण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण भवन, कॅम्प येथून जारी करण्यात आलेल्या या आदेशात शाळांमधील दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी शिपाई पद आवश्यक असल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शाळा परिसराची देखभाल, घंटा वाजवणे, कार्यालयीन सहाय्य,



विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंबंधी कामे आणि इतर पूरक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नसल्याने शिक्षकांनाच ही अतिरिक्त कामे करावी लागत आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शनास आली होती.

जिल्हा परिषदेकडून ग्रामपंचायतींना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांच्या हद्दीतील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेची प्रत्यक्ष पाहणी करून शिपाई पदाची गरज तपासावी. यासाठी शिक्षण विभागाशी समन्वय साधून विद्यार्थ्यांची संख्या, शाळेचे कामकाज, उपलब्ध कर्मचारी आणि स्थानिक गरजा लक्षात घ्याव्यात.तसेच ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती, निधीची उपलब्धता आणि संबंधित कायदेशीर तरतुदी विचारात घेऊन पुढील निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ६१ तसेच शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे बंधनकारक असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

**ग्रामपंचायत स्तरावर वाढणार जबाबदारी**

या आदेशामुळे ग्रामपंचायतींची शिक्षण व्यवस्थेतील भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. स्थानिक स्तरावर शाळांच्या गरजा ओळखून निर्णय घेण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर येणार असून, शिक्षण व्यवस्थापनातील उत्तरदायित्व अधिक स्पष्ट होणार असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.सदर आदेश गजानन पाटील यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आले असून, जिल्हाभरातील ग्रामपंचायतींनी याबाबत लवकरात लवकर अहवाल सादर करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिपाई नसल्याने शिक्षकांनाच स्वच्छतेपासून ते प्रशासकीय कामांपर्यंत अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. परिणामी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अध्यापनावर परिणाम होत असल्याचे चित्र होते.या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्रशासनाने घेतलेला निर्णय शिक्षकांसाठी दिलासादायक मानला जात आहे. शाळांमध्ये शिपाई नियुक्त झाल्यास शिक्षकांना केवळ अध्यापनावर लक्ष केंद्रित करता येणार असून, विद्यार्थ्यांनाही अधिक स्वच्छ आणि शिस्तबद्ध वातावरण मिळणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### “जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या तिन्ही शाळांचा दहावीचा शंभर टक्के निकाल

उरण (दैनिक संध्या) : जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था संचलित हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियम स्कूल, न्यू इंग्लिश मिडियम स्कूल तसेच पदाजी पांडुरंग मुंबाईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या तिन्ही विद्यालयांचा इयत्ता दहावीचा मार्च २०२६ परीक्षेचा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून तिन्ही शाळांनी शंभर टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण उपलब्ध व्हावे, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि शहरांप्रमाणेच आधुनिक शिक्षणाच्या संधी गावागावात पोहोचाव्यात या दूरदृष्टीतून संस्थेचे संस्थापक मा. श्री. जे. एम. म्हात्रे साहेब यांच्या विचारातून या शाळांची निर्मिती करण्यात आली होती. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संस्थेचा संकल्प आजही यशस्वीपणे पुढे नेला जात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. तिन्ही विद्यालयांतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक व नागरिकांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




### फिजिक्सवालाचे सात विद्यार्थी परफेक्ट 500/500 गुण मिळवून यशस्वी ठरले

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (MSBSHSE) इयत्ता 10वी बोर्ड परीक्षेचे निकाल जाहीर केले असून फिजिक्सवाला च्या पीडब्ल्यू चे उडान 2026 (इयत्ता 10वी) महाराष्ट्र बॅच मधील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र एसएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. या निकालात सात विद्यार्थ्यांनी परफेक्ट 500/500 गुण मिळवले आहेत. 500/500 गुण मिळवणारे विद्यार्थी म्हणजे अर्पिता दत्ता वडकर (लातूर), ओंकार कल्याण राठोड (लातूर), मृण्मयी संतोष वैकार (छत्रपती संभाजीनगर), रुद्र अभय उत्पट (पुणे), शिवम दत्तात्रय चाटे (लातूर), स्नेहा चक्रधर करभारी (लातूर) आणि सूरज अंकुश बडे (छत्रपती संभाजीनगर). याशिवाय, 25+ विद्यार्थ्यांनी 99% आणि त्यापेक्षा जास्त गुण मिळवले, 55+ विद्यार्थ्यांनी 98% आणि त्यापेक्षा जास्त, 98+ विद्यार्थ्यांनी 97% आणि त्यापेक्षा जास्त, 156+ विद्यार्थ्यांनी 96% आणि त्यापेक्षा जास्त, 254+ विद्यार्थ्यांनी 95% आणि त्यापेक्षा जास्त, तर 936+ विद्यार्थ्यांनी 90% आणि त्यापेक्षा जास्त गुण मिळवले. एकूण 27 विद्यार्थ्यांनी गणितात 100/100 गुण मिळवले, तर 9 विद्यार्थ्यांनी विज्ञानात 100/100 गुण मिळवले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना फिजिक्सवाला चे शिक्षक व संस्थापक अलख पांडे म्हणाले, “महाराष्ट्र बोर्ड परीक्षेत आमच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीबद्दल आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. हे निकाल विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा पाठिंबा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचे प्रतिबिंब आहेत. पीडब्ल्यू मध्ये आमचे लक्ष शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात साथ देणे यावर केंद्रित आहे.” पीडब्ल्यू महाराष्ट्र बोर्ड विद्यार्थ्यांना सातत्याने मदत करत आहे. लाईव्ह क्लासेस, प्रॅक्टिस मॉड्यूल्स, शंका निरसन सुविधा आणि अभ्यासक्रमाशी संलग्न तयारीद्वारे विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षांसाठी आवश्यक मार्गदर्शन पुरवत आहे.

### जग आता कोरोनापेक्षाही खरतनाक आजाराच्या विळख्यात, लॉकडाऊन लागणार?

पुणे (दैनिक संध्या) : काही वर्षांपूर्वी कोरोनाने संपूर्ण जगभरात खळबळ उडून दिली होती. कोरोनाच्या लाटेमध्ये अनेकांचा मृत्यू झाला. संपूर्ण जगभरात हाहाकरा उडाला होता. कोरोना काळात संपूर्ण जग ठप्प झालं होतं. जगातील जवळपास सर्वच देशांमध्ये लॉकडाऊन लावण्यात आलं होतं. या लॉकडाऊनचा अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला. दरम्यान आता पुन्हा एकदा एक चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे सध्या हंता व्हायरसचा प्रादुर्भाव वाढला आहे. या वर्षी एप्रिल महिन्यात अर्जेटीनामधून रवाना झालेल्या एका क्रूजवर पहिल्यांदा या आजाराचे रुग्ण आढळून आले होते. या क्रूजमधून 108 जण प्रवास करत होते, त्यातील 8 जणांना या आजाराची लागण झाली होती, त्यातील तिघांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका डच कपलचा समावेश होता, तर एक प्रवासी हा जर्मनीचा नागरिक होता. दरम्यान आता या आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पुन्हा एकदा लॉकडाऊन लागणार का? अशी भीती अनेकांच्या मनात निर्माण झाली आहे. मात्र जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांनुसार सध्या संधी घाबरण्यासारखी कोणतीही परिस्थिती नाहीये. सध्या तरी या आजाराचा फार प्रादुर्भाव झालेला नाही. मात्र ध्रुवीय प्रदेश किंवा इतर देशांसाठी तुम्ही क्रूज बुक करत असाल तर काळजी घ्यावी असं आवाहन जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांकडून करण्यात आलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांनुसार जर तुम्ही अशा देशांमध्ये फिरण्यासाठी जाणार असाल ज्या देशांमध्ये या आजाराचा प्रादुर्भाव वाढला आहे, तर सध्या तरी अशा देशांमध्ये जाऊ नका. जर समजा तुम्ही अशा देशांना भेट दिलीच तर अशा भागांमध्ये जाणं टाळा ज्या प्रदेशामध्ये या आजाराचा धोका जास्त आहे. प्रवासादरम्यान स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. हंता व्हायरसचा प्रसार हा उंदराच्या मल-मुत्राद्वारे होते. गेल्यावर्षी याच आजारामुळे प्रसिद्ध अभिनेता जीन हॅकमॅन याच्या बायकोचं निधन झालं होतं. सध्या तरी या आजारावर कुठलीही लस किंवा उपचार उपलब्ध नाहीयेत, त्यावर तज्ज्ञांचं संशोधन सुरू आहे. अशी माहिती देखील या संदर्भात जागतिक आरोग्य संघटनेकडून देण्यात आली आहे.

### जगाचे असे देश जेथे सापांचा वावर मोठा

पुणे (दैनिक संध्या) : जगात सापांच्या अनेक जाती आहे.त्यातील काही विषारी आहेत तर काही बिनविषारी आहेत. ‘द रेप्टाइल डेटाबेस’ या आंतरराष्ट्रीय ऑनलाईन डेटाबेसनुसार जगातील सर्व सरपटणाऱ्या प्राण्यांची माहिती जतन केली जाते. या संस्थेच्या मते जगात ४,१०० हून अधिक सापांच्या प्रजाती आहेत. प्रत्येक वर्षी नवीन प्रजाती सापडत आहे. Amazon, द.आशिया आणि पावसाच्या प्रदेशात नवीन सरीसृप (सरपटणारे प्राणी) शोधले जात आहेत. मात्र, काही असे देश आहेत जेथे सापांची संख्या आणि विविधता जास्त आहे. हे देश वाईल्डलाईफ प्रेमी आणि एडव्हेंचर ट्रॅव्हलर्ससाठी खास आकर्षण बनले आहेत. मात्र, या प्रांतात फिरण्याआधी योग्य सावधानता बाळगली पाहिजे. बातमीनुसार मॅक्सिकोमध्ये सापांच्या सुमारे ४३८ प्रजातींचे साप आहेत. येथे वाळवंट, जंगल आणि पर्वतमय प्रदेश सांपासाठी आदर्श मानले जातात. Baja California आणि Yucatan Peninsula सारखे भागात रॅटलस्नेक सापडणे सर्वसामान्य आहे. तर ब्राझीलमध्ये सापांच्या ४२० हून जास्त प्रजाती आहेत. Amazonचे रेनफॉरेस्ट जगातील सर्वाधिक सापांचे क्षेत्र म्हटले जाते. येथे विशाल एनाकोंडापासून अनेक प्रकारचे साप आढळतात. भारतात ३०० हून जास्त सापांच्या प्रजाती आहेत. यात ‘बिग फोर’ सर्वात जास्त खतरनाक मानले जातात. कॉमन क्रेट (साधा मण्यार), रसेल वायपर ( घोणस ), सॉ-स्केल्ड वायपर ( फुरसे ) आणि स्पेक्टेकल्ड कोब्रा ( भारतीय नाग ) भारतात होणाऱ्या ९० टक्के सर्प दंशाच्या घटनांना जबाबदार असतात.

# डिजिटल इंजिनिअरिंग अनुभव केंद्रासाठी सामंजस्य करार

पुणे (दै. संध्या) :

डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय विद्यापीठ (DYPIU) ने आपल्या कॅम्पसमध्ये अत्याधुनिक डिजिटल इंजिनिअरिंग आणि डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग अनुभव केंद्र स्थापन करण्यासाठी डसॉल्ट सिस्टिम्स सोबत सामंजस्य करार (MoU) केला आहे. या उपक्रमाचा उद्देश उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील सहकार्य अधिक बळकट करणे तसेच बदलत्या औद्योगिक गरजांनुसार विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करणे हा आहे.




डसॉल्ट सिस्टिम्सच्या सहकार्याने विकसित होणारे हे अनुभव केंद्र DYPIU च्या स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग अभ्यासक्रमात अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश करेल. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील पिढीतील अभियांत्रिकी आणि उत्पादन प्रक्रियेबाबत सैद्धांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवही मिळणार आहे. महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या पहिल्या उपक्रमांपैकी हा एक असून, उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्माण करण्यासोबतच प्रगत उत्पादन क्षेत्रातील संशोधन आणि नवकल्पनांना चालना देण्याचा यामागील उद्देश आहे.

या केंद्रात नेक्स्टजन प्रॉडक्ट इनोव्हेशन लॅब, इंटेलिजंट प्रॉडक्शन सिस्टम लॅब आणि व्हर्च्युअल ट्विन व सिम्युलेशन लॅब अशा अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असतील. विद्यार्थ्यांना व्हर्च्युअल ट्विन्स, जनरेटिव्ह डिझाइन, मल्टी-फिजिक्स सिम्युलेशन आणि डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग सिस्टिम्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव घेता येईल. या सहकार्यांतर्गत विद्यार्थ्यांना लाईव्ह प्रोजेक्ट्स, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, इंटर्नशिप्स आणि उद्योग तज्ज्ञांशी संवाद यांचा लाभ मिळणार आहे. तसेच प्राध्यापक विकास आणि अभ्यासक्रम उन्नतीसाठीही हे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरणार असून जागतिक औद्योगिक मानकांशी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करण्यात मदत होणार आहे. याशिवाय, प्रगत डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग प्रक्रियांमध्ये प्राध्यापकांना प्रावीण्य मिळावे यासाठी तीन वर्षांचा “ट्रेनिंग ऑफ ट्रेनर्स” (ToT) कार्यक्रम राबविण्याचीही योजना आहे.

“DYPIU सोबत अनुभव केंद्र स्थापनेचे हे सहकार्य शैक्षणिक शिक्षण आणि प्रत्यक्ष औद्योगिक उपयोग यांतील दरी कमी करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. 3DEXPERIENCE प्लॅटफॉर्म आणि व्हर्च्युअल ट्विन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ‘मेक इन इंडिया’ आणि इंडस्ट्री 4.0 च्या गरजांशी सुसंगत नवोन्मेषक परिसंस्था निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे,” असे डसॉल्ट सिस्टिम्स इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक दीपक एनजी यांनी सांगितले.

DYPIU चे कुलगुरू प्रा. (डॉ.) मनीष भल्ला म्हणाले, “हे सहकार्य DYPIU च्या प्रगतीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. डसॉल्ट सिस्टिम्सच्या सहकार्याने DYPIU मध्ये स्थापन होणारे हे अनुभव केंद्र महाराष्ट्रातील स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील अशा प्रकारच्या पहिल्या केंद्रांपैकी एक असेल. यामुळे अनुभवाधारित शिक्षणाची मजबूत परिसंस्था निर्माण होईल, जिथे विद्यार्थी प्रत्यक्ष औद्योगिक समस्यांवर काम करत प्रभावी तंत्रज्ञान हस्तांतरण प्रक्रियेत सहभागी होतील. हा उपक्रम आमच्या विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना नवोन्मेष करण्यास, अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबत कार्य करण्यास आणि खऱ्या अर्थाने भविष्याभिमुख अभियंते म्हणून विकसित होण्यास सक्षम करेल.

नवोन्मेष, उद्योग-सहभाग आणि भविष्याभिमुख शिक्षणाच्या माध्यमातून उच्च शिक्षणाची नव्याने व्याख्या करण्याच्या दृष्टीकोनातून स्थापन झालेले D Y Patil International University हे एक बहुविषयक विद्यापीठ आहे. अनुभवाधारित, संशोधनकेंद्रित आणि तंत्रज्ञान-सक्षम शिक्षण देण्यास विद्यापीठ कटिबद्ध आहे. अनेक दशकांची शिक्षण, आरोग्यसेवा आणि सामाजिक विकास क्षेत्रातील समृद्ध परंपरा लाभलेल्या D Y Patil Group च्या भक्कम वारशावर आधारित DYPIU शैक्षणिक नवोन्मेष आणि राष्ट्रनिर्मितीची परंपरा पुढे नेत आहे. अभियांत्रिकी, व्यवस्थापन, डिझाइन, जैवतंत्रज्ञान, मीडिया, लिबरल आर्ट्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांमध्ये विद्यापीठ अभ्यासक्रम उपलब्ध करून देते. उद्योग सहकार्य, जागतिक संधी, उद्योजकता आणि कौशल्यविकास यांवर विशेष भर देत अत्याधुनिक पायाभूत सुविधा, नवोन्मेष केंद्रे आणि अग्रगण्य उद्योगांसोबतच्या भागीदारीद्वारे DYPIU विद्यार्थ्यांना कुशल व्यावसायिक, नवोन्मेषक आणि जबाबदार जागतिक नागरिक म्हणून घडवत आहे.

## पेट्रोल-डिझेल वाचवा, वर्क फ्रॉम होम करा : पंतप्रधान मोदी

नवी दिल्ली (दै. संध्या) :

देशासाठी मरणे हीच केवळ देशभक्ती नसते तर देशासाठी जगणे आणि आपले कर्तव्य निभावणे ही देखील देशभक्ती आहे. यासाठी जागतिक संकटाच्या काळात काही संकल्प करावे लागतील आणि ते पूर्ण भावनेने पूर्ण करावे लागेल असे आवाहन नरेंद्र मोदी यांनी येथे केले. तेलंगणात सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विविध योजनांचे उद्‌घाटन आणि भूमिपूजन पंतप्रधान यांच्या हस्ते व्हर्च्युअली करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. गेले दोन महिने मध्य पूर्वेतील युद्धामुळे नवे संकट निर्माण झाले आहे.त्यामुळे इंधनाची टंचाई निर्माण झाली आहे. देशवासियांवर या संकटाची झळ पोहचू नये यासाठी सरकार सतत प्रयत्न करत आहे. नागरिकांवर ओझे पडू नये यासाठी सरकार सारे ओझे स्वत:च्या खांद्यावर घेत आहे. मात्र, पुरवठा साखळीवर सतत संकट असेल तर आम्ही किती उपाय केले तरी अडचणी वाढतच जातात. आता देशाला सर्वतोपरी ठेवत आपल्याला एकजूठ होऊन लढावे लागेल



असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की या जागतिक संकटाच्या समयी सर्वात मोठा संकल्प पेट्रोल डिझेलचा जपून वापर करणे हा आहे, कारण जर आपण इंधन जपून वापरले जर परकीय चलनाची बचत होईल असेही पंतप्रधान यावेळी म्हणाले. ते पुढे म्हणाले की कोरोना काळात आपण वर्क फ्रॉम होम, ऑनलाईन मिटिंग, वीडियो कॉन्फरन्स आपलेसे केले आणि अनेक उपाय केले. आपल्याला त्यांची सवय देखील झाली. आजच्या काळाची गरज आहे की आपण त्या पद्धतींचा पुन्हा वापर करायला हवा. कारण हे देशाच्या हिताचे असेल आणि त्यांना पुन्हा एकदा प्राथमिकता देणे गरजेचे आहे.

## महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला ‘आयएसओ’ नामांकन

मुंबई (दै. संध्या) :



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट कामांबद्दल आयएसओ (इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टॅंडर्डायझेशन) नामांकन मिळाले. महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या नेतृत्वाखाली आणि अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्या मार्गदर्शनाखाली जनसंपर्क विभागाने हे यश मिळविले आहे. जनसंपर्क विभागामध्ये महाराष्ट्रात आयएसओ नामांकन मिळविणारा महापारेषणचा जनसंपर्क विभाग पहिलाच ठरला आहे.

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करत अनेक अभिनव उपक्रम राबविले आहेत. ‘महापारेषण समाचार’ या गृहमासिकेमध्ये क्यू-आर कोड, पॉडकास्ट आणि डिजिटल संवाद तंत्रज्ञानाचा वापर करून माहिती सादरीकरणाला आधुनिक रूप दिले. जाहिराती आणि जनजागृती मोहिमांमध्ये डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करणारा हा विभाग राज्यातील अग्रगण्य विभाग म्हणून ओळखला जातो.

विशेष म्हणजे, जनसंपर्क क्षेत्रात तब्बल १५ पुरस्कार पटकाविण्याचा विक्रमही महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने आपल्या नावावर केला आहे. आयएसओ नामांकनामुळे महापारेषणच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

दरम्यान, महापारेषणच्या जनसंपर्क विभागाचे आयएसओ नामांकनचे प्रमाणपत्र लेखानिबंधक श्री. विजयकुमार स्वामी यांनी अपर जिल्हाधिकारी तथा महापारेषणच्या कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांच्याकडे सुपूर्द केले. याप्रसंगी महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क विभागाचे श्री. श्रीकांत जाधव उपस्थित होते.

### जनसंपर्क विभाग अग्रेसर : डॉ. संजीव कुमार


महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस) जनसंपर्क विभागाने महापारेषणची भूमिका लोकांसमोर सकारात्मकपणे ठळकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण अभिनव कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

## सोनी सबचं यादें प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवतंय

नवी दिल्ली (दै. संध्या) :

सोनी सबवरील यादें प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवतंय डॉ. देव मेहता (इक्बाल खान) यांच्या प्रेम, हरवलेली आठवण आणि भावनिक ताकदीच्या प्रवासातून हरवलेल्या आठवणींमुळे बदललेल्या आयुष्याशी सामना करताना देव स्वतःच्या भूतकाळाला धरून ठेवायचं की समोर उभं राहिलेलं वास्तव स्वीकारायचं, यामध्ये अडकलेला दिसतो.

आगामी भागांमध्ये, स्वतःच्या अपूर्ण भावनांनाही बाजूला ठेवून देव एक कठीण निर्णय घेतो आपल्या माजी पत्नी सृष्टी अग्रवाल (गुलकी



जोशी) हिच्या दिग्गी (अर्जुन पुंज) सोबतच्या एंगेजमेंटला पाठिंबा देण्याचा. स्वतःच्या भावनांपेक्षा सृष्टीच्या आनंदाला महत्त्व देत देव तिला दिग्गीसोबतच्या नव्या सुरुवातीला स्वीकारायला प्रोत्साहित करतो. एवढंच नाही तर तो एंगेजमेंटच्या तयारीत तिची साथ देतो आणि शांतपणे आधारस्तंभ बनतो. तयारीदरम्यान दोघं एकत्र वेळ घालवतात आणि जुन्या आठवणी व न बोललेल्या भावना पुन्हा जाग्या होतात, ज्यामुळे दोघांसाठीही आतल्या भावनांकडे दुर्लक्ष करणं कठीण होतं.

देवचं प्रेम सृष्टीला दिग्गीसोबतचं एंगेजमेंट रद्द करायला भाग पाडेल की ती खरंच एंगेज होईल?

या ट्रॅकबद्दल बोलताना इक्बाल खान म्हणतो, “कधी कधी सर्वात कठीण गोष्ट म्हणजे मागे हटणं, जेव्हा मनात फक्त धरून ठेवायची इच्छा असते. देवसाठी हा टप्पा मोठ्या कृतींबद्दल नाही, तर सृष्टीला काय हवंय हे समजून घेणं आणि त्याचा आदर करणं, जरी त्याला दुखत असलं तरी. मला या ट्रॅकबद्दल सर्वात खरी गोष्ट वाटते ती म्हणजे तो तिच्यासाठी उभा राहतो, तिला परत जिंकण्यासाठी नाही, तर तिच्या आनंदाची खरी काळजी घेणारा म्हणून. ही त्याच्यासाठी शांत आणि भावनिक जागा आहे, जिथे तो स्वतःच्या भावनांशी झुंज देतोय आणि तरीही ज्याच्यावर प्रेम करतो तिच्यासाठी उपस्थित राहतोय.”

यादें पाहायला विसरू नका, दर सोमवार ते शनिवार रात्री 8 वाजता, फक्त सोनी सब वर.

## उर्विल पटेलने काढली चिठ्ठी

नवी दिल्ली (दै. संध्या) :

आयपीएल 2026 स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्सने जबरदस्त कमबॅक केलं. सुरूवातीला पाच सामन्यात पराभव झाल्याने प्लेऑफच्या आशा मावळल्या होत्या. पण त्यानंतर चेन्नई सुपर किंग्सने जोरदार कमबॅक केलं. आतापर्यंत खेळलेल्या 11 पैकी 6 सामन्यात विजय मिळवला आहे. तसेच 12 गुणांसह पाचव्या स्थानी झेप घेतली आहे. आता उर्वरित तीन पैकी दोन सामन्यात विजय मिळवला तर प्लेऑफमधील स्थान पक्कं होईल. असं सर्व चित्र असताना लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या सामन्यात उर्विल पटेलच्या आक्रमक खेळीची चर्चा होत आहे. त्याने 23 चेंडूत 8 षटकार आणि 2 चौकाराच्या मदतीने 65 धावांची खेळी केली. यावेळी त्याचा स्ट्राईक रेट हा 282.61 चा होता. तर त्याने 13 चेंडूत अर्धशतक पूर्ण केलं. त्याने 384.62 स्ट्राईक रेटने अर्धशतकी खेळी केली. यानंतर त्याने खिशातून एक चिठ्ठी काढली आणि सर्वांना दाखवली. यावर वडिलांसाठी एक खास संदेश लिहिला होता. उर्विल पटेलने अर्धशतक पूर्ण केल्यानंतर पहिल्यांदा दोन हात जोडून देवाचे आभार मानले. त्यानंतर त्याने खिशात हात घातला आणि एक चिठ्ठी काढली. त्यावर ‘पप्पा हे तुमच्यासाठी आहे.’ असं लिहिलं होतं. त्यात उर्विलने गुजरातीत एक खास मेसेज लिहिला होता. या खेळीनंतर उर्विल पटेल म्हणाला की, ‘ माझ्या मनात काहीच नव्हतं, मला फक्त परिस्थिती आणि चेंडूनुसार फलंदाजी करायची होती.

# गॅसचा वापर अत्यंत संयमाने करणे ‘काळाची गरज’ : नरेंद्र मोदी

### तेलंगणातील विकासकामांच्या उद्‌घाटन प्रसंगी दिला इंधन बचतीवर भर

हैदराबाद (दै. संध्या) :

पश्चिम आशियातील सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज (दि. १०) देशवासीयांना पेट्रोलियम उत्पादनांचा वापर अत्यंत संयमाने करण्याचे आवाहन केले. तेलंगणामध्ये सुमारे ९,४०० कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्‌घाटन करताना पंतप्रधानांनी इंधन बचतीवर भर दिला. भारत मोठ्या प्रमाणावर इंधन आयात करत असल्याने सध्याच्या परिस्थितीत संयम पाळणे ही 'काळाची गरज'



असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"आज पेट्रोल, गॅस आणि डिझेल यांसारख्या गोष्टींचा अत्यंत संयमाने वापर करणे ही काळाची गरज आहे. आपल्याला आयात केलेली पेट्रोलियम उत्पादने केवळ आवश्यकतेनुसारच वापरावी लागतील. यामुळे केवळ परकीय चलनच वाचणार नाही, तर युद्धाच्या प्रतिकूल परिणामांची तीव्रताही कमी होईल," असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधानांनी अक्षय आणि पर्यायी ऊर्जेच्या क्षेत्रात भारताने केलेल्या प्रगतीचाही उल्लेख केला. सौर ऊर्जा निर्मितीत भारत आज जगातील आघाडीच्या देशांपैकी एक आहे. तसेच, आयात इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्याच्या मोहिमेत भारताने अभूतपूर्व प्रगती केल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारच्या बहुआयामी ऊर्जा धोरणावर बोलताना मोदी म्हणाले की, सरकारने प्रथम प्रत्येक घरापर्यंत 'एलपीजी' (LPG) पोहोचवण्यावर लक्ष केंद्रित केले आणि आता स्वस्त 'पाईप्ड गॅस' (PNG) पुरवठा वाढवण्याकडे लक्ष दिले जात आहे. याशिवाय, सीएनजी (CNG) आधारित इकोसिस्टमलाही केंद्र सरकार सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे.

तेलंगणातील प्रकल्पांचा शुभारंभ करताना पंतप्रधान म्हणाले की, भारत आज 'रिफॉर्म्स एक्स्प्रेस'वर स्वार होऊन आधुनिक पायाभूत सुविधांची निर्मिती करत आहे. यामध्ये हैदराबाद-पणजी इकॉनॉमिक कॉरिडॉरवरील गुडेबेलूर ते महबूबनगर (NH-167) या मार्गाचे चौपदरीकरण. संगारेड्डी जिल्ह्यातील जहीराबाद औद्योगिक क्षेत्राचा विकास, काझीपेठ-विजयवाडा रेल्वे मल्टी-ट्रॅकिंग प्रकल्पाचे काही टप्पे आणि काझीपेठ रेल्वे बायपास. हैदराबादमधील 'ग्रीनफील्ड पेट्रोलियम, ऑईल अँड ल्युब्रिकंट्स' (POL) टर्मिनल आदींचा समोश असल्याचेही त्यांनी सांगितले.

### काकतीय मेगा टेक्सटाईल पार्क

सुमारे १,७०० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले वारंगल येथील 'पीएम मित्रा पार्क' (काकतीय मेगा टेक्सटाईल पार्क) हे देशातील पहिले पूर्णतः कार्यान्वित पार्क आहे. केंद्र सरकारच्या '5F' व्हिजन अंतर्गत हे पार्क कापड उद्योगाला बळकटी देण्यासाठी आणि निर्यातीला चालना देण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### गणवेश खरेदी तातडीने सुरु करा; विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश मिळावा

पिंपरी (दैनिक संध्या) : गणवेश खरेदीप्रक्रिया आता सुरू केल्यास पिंपरी-चिंचवड महापालिका शाळेतील गोरगरीब विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेश मिळेल. त्यामुळे स्थायी समितीने मंजुरी दिल्यानंतर प्रक्रिया सुरू करून गणवेशांची खरेदी करण्यात यावी, असे विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे. महापालिकेच्या बालवाड्यांसह प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी शालेय व पीटी गणवेश, स्वेटर, सॉक्स, रेनकोट, दप्तर, वेस्टकोट, हातरुमाल, हेअर बॅण्ड, रिबीन, टाय आदी साहित्य सोलापूर येथील जगदंबा संस्थेकडून खरेदी करण्याचा ठराव दोन एप्रिलच्या शिक्षण समितीने मंजूर केला आहे. त्याला स्थायी समितीने 22 एप्रिलला मान्यता दिली आहे. त्यानुसार गणवेश खरेदीप्रक्रिया सुरू करण्यात यावी. शासनाद्वारे निश्चित केलेल्या दरानुसार उत्तम दर्जाचे साहित्य मिळणार आहे. विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचे काम सोलापूर येथील श्री जगदंबा महिला रेडिमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था मर्यादित या अंध व दिव्यांगांसाठी कार्यरत संस्थेमार्फत केले जाणार आहे. तिच्या माध्यमातून अनेक अंध, दिव्यांग नागरिकांना प्रवाहात आणून रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे त्या संस्थेमार्फत साहित्य घेतल्यास महापालिकेच्या नावलौकीकात भर पडेल, अशी शिफारस विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी केली आहे. शिक्षण समितीच्या प्रस्तावाला स्थायी समितीने 22 एप्रिलच्या सभेत मान्यता दिली आहे. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य संदीप वाघेरे व विकास साने यांची सूचक व अनुमोदक म्हणून नावे आहेत. मात्र, त्या विषयास आम्ही समंती दिलेली नाही. तसा कोणताही ठराव सुचवलेला नाही. त्यामुळे आमच्या नावाची नोंद तातडीने रद्द करावी, असे पत्र संदीप वाघेरे व विकास साने यांनी आयुक्तांना दिले आहे. त्यानंतर नगर सचिव विभागाने त्यात दुरुस्ती केली आहे. सूचक व अनुमोदक म्हणून बाबासाहेब त्रिभुवन व शालिनी गुजर यांच्या नावांची नोंद केली आहे.



### पीसीएमसीच्या नगर सचिवपदी उल्हास जगताप यांची नियुक्ती होण्याची शक्यता

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने नगर सचिव पदासाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सेवानिवृत्त अधिकारी त्या पदावर एका वर्षासाठी मानधन तत्त्वावर निवृत्त अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप यांची नियुक्ती करण्याचा विषय 15 मे रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर आहे. महापालिकेच्या सभा शाखेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी नगर सचिवपद कंत्राटी पद्धतीने भरण्यात येत आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी त्या पदासाठी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध केली होती. जाहिरातीला प्रतिसाद देऊन 30 एप्रिलपर्यंत मुदतीमध्ये केवळ उल्हास जगताप यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाला आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेला अर्ज बाद करण्यात आला. एका उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाला आहे. त्यामुळे निवड प्रक्रिया पूर्ण केली जाणार की, पुन्हा नव्याने अर्ज मागविण्यात येणार, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. मुदतीमध्ये केवळ एका उमेदवाराचा अर्ज वैध ठरला आहे. उल्हास जगताप यांची कंत्राटी नगर सचिव म्हणून एक वर्षासाठी नियुक्त करण्याचा ठराव विधी समितीने मंजूर करून सर्वसाधारण सभेकडे शिफारस केली आहे. येत्या शुक्रवारी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत उल्हास जगताप यांची नगर सचिवपदी नियुक्ती होण्याची दाट शक्यता आहे.

### 112 कोटींची पीसीएमसीची 'पेपरलेस' प्रणालीच ठप्प; कामकाजाचा खोळंबा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेने डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टमद्वारे कागदपत्रांची व्यवस्थापन करणाऱ्या प्रणालीवर (डीएमएस) तब्बल 112 कोटी रुपयांचा खर्च केला आहे. एका वर्षापासून महापालिकेचा संपूर्ण कारभार त्या नव्या ई-ऑफिस संगणक प्रणालीमार्फत होत असल्याने पेपरलेस कारभार होत असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, त्या प्रणालीत वारंवार बिघाड होत असल्याने कामाचा खोळंबा होऊन, कामकाज ठप्प होत आहे. तसेच, या प्रणालीवर प्रशासकीय राजवटीनंतर लोकप्रतिनिधींच्या काळातही उधळपट्टी सुरू असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या पेपरलेस कारभाराची भीक नको, पण...अशी अवस्था झाली आहे. महापालिकेत डीएमएस प्रणाली सुरू होऊन एक वर्ष झाल्यानंतर यामध्ये वारंवार तांत्रिक अडचणी येत आहेत. वास्तविक 112 कोटींचा खर्च केलेली प्रणाली बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे. सर्व कामकाज संथगतीने सुरू झाल्याने कामे जागेवर ठप्प होत आहेत. डीएमएस प्रणाली नकोच, अशी मागणी अधिकारी व पदाधिकारी करू लागले आहेत. या व्यवस्थेत अनेक त्रुटी प्रलंबित असून, सातत्याने वेगवेगळ्या अडचणी निर्माण होत आहेत. प्रत्येक फाईलसाठी अधिकचा वेळ जात आहे.

### स्वीकृत नगरसेवक निवडीचा वाद; भाजपकडून विषय पुन्हा तहकूब

पिंपरी (दैनिक संध्या) : स्वीकृत दहा नगरसेवक निवडीचा विषय सत्ताधारी भाजपाकडून पुन्हा तहकूब करण्यात येत आहे. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेसने सभागृहात घोषणाबाजी केली होती. त्यावर कळस करत सत्ताधाऱ्यांनी तो तहकूब विषय मे महिन्याच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेतून वगळा आहे. सत्ताधार्यांच्या या भूमिकेवरून महापालिका वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगली आहे. एकमत न झाल्याने स्वीकृत नगरसेवकांची सात नावे अद्याप सत्ताधार्यांकडून निश्चित झालेली नाहीत. सत्ताधाऱ्यांनी तो विषय 5 मे रोजीच्या तहकूब सभेत सलग तिसऱ्यांदा तहकूब केला. त्यावर विरोधातील राष्ट्रवादी काँग्रेसनं तीव्र आपेक्ष घेत महापौरांच्या आसनासमोर जमा होत घोषणाबाजी केली. राष्ट्रवादीची तीन नावे घोषित करा. सत्ताधाऱ्यांनी आपली सात नावे फुरसतीनुसार घोषित करण्याचा निर्णय घ्यावा, असा खोचक सल्लाही विरोधकांनी दिला. मात्र, सत्ताधारी काही नमले नाहीत. महापौर रवी लांडगे यांनी तो विषय पुन्हा तहकूब करत सभा कामकाज सुरू केले. त्यावर गोंधळ वाढल्याने महापौरांनी सभा 15 मिनिटे तहकूब केली. मे महिन्याची सर्वसाधारण सभा 15 मे रोजी दुपारी दोनला आयोजित केली आहे. त्या सभेची विषयपत्रिका नगर सचिव विभागाने महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. त्यात स्वीकृत नगरसेवक निवडीचा विषयच वगळण्यात आला आहे. नियमानुसार तहकूब झालेला विषय पुढील सभेत घेतला जातो.

# भाजपमध्ये पक्ष संघटनेपेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही – ॲड. भरत पाटील

**मोरवाडी कार्यालयात शहर पक्ष संघटनेच्या कामकाजाचा घेतला आढावा**




**पिंपरी (दै. संध्या)**

"राजकारणात काम करत असताना पक्ष संघटना ही नेहमी वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपेक्षा मोठी असते. प्रत्येक कार्यकर्त्याने ही भावना मनाशी पक्की बाळगली पाहिजे, कारण भारतीय जनता पक्षात संघटनेपेक्षा श्रेष्ठ या जगात कोणीही नाही," असे ठाम प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नवनियुक्त शहर प्रभारी ॲड. भरत पाटील यांनी केले.

मोरवाडी येथील पक्ष कार्यालयात आयोजित पिंपरी-चिंचवड शहराच्या महत्त्वपूर्ण संघटनात्मक आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ॲड. पाटील यांची प्रभारीपदी नियुक्ती केल्यानंतर आगामी पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची ताकद वाढवण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

या बैठकीला शहराध्यक्ष शत्रूघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस ॲड.मोरेश्वर शेडगे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडये,युवा मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे, दिनेश यादव यांसह सर्व जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चे, आघाडी, सेल, प्रकोष्ठ आणि मंडल अध्यक्ष-सरचिटणीस उपस्थित होते. या बैठकीत ॲड. भरत पाटील यांनी शहरातील पक्ष संघटनेच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना पक्ष बळकटीकरणावर विशेष भर दिला.

याप्रसंगी शहराध्यक्ष शत्रूघ्न काटे, आमदार गोरखे यांनी देखील उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शत्रुघ्न काटे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून आम्ही जनसेवेचे व्रत घेतले आहे. शहरातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासोबतच, सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्याला सोबत घेऊन पक्षाची ध्येयधोरणे घराघरांत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कार्यकर्त्यांचे कष्ट आणि जनतेचा विश्वास हीच आपली खरी ताकद असून आगामी काळात पक्ष संघटना अधिक गतिमान करण्यावर आमचा भर असेल.

मोरवाडी येथील शहर भाजपा मध्यवर्ती कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या तयारीला या निमित्ताने वेग आला आहे.

## लहान मुलींवर अत्याचाराचा प्रयत्न करणारा सुरक्षारक्षक गजाआड

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवड शहरातील एका उच्चभ्रू सोसायटीत माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना उघडकीस आली आहे. ज्याच्यावर सोसायटीच्या सुरक्षेची जबाबदारी होती, त्याच सुरक्षारक्षकाने तीन अल्पवयीन मुलींशी अश्लील चाळे करत त्यांच्यावर अत्याचाराचा प्रयत्न केला. मात्र, यातील एका १० वर्षीय चिमुरडीने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या नराधमाचा डाव उधळला असून पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गणेश जामदार यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (दि. ८ मे) दुपारी सोसायटीत शांतता असताना आरोपी दिनेश चौधरी (वय २५) याने तीन मुलींना गाठले. 'तुम्हाला टेरेसवर पाण्याची टाकी दाखवतो,' असे आमिष दाखवून तो या चिमुरड्यांना बिल्डिंगच्या सातव्या मजल्यावर घेऊन गेला. तिथे त्याने या मुलींशी अश्लील चाळे करत त्यांच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार कोणाला सांगितला तर मारून टाकेन, अशी धमकीही या सुरक्षा रक्षकाने मुलींना दिली होती. आरोपीच्या या धमकीमुळे मुली प्रचंड घाबरल्या होत्या. मात्र, त्यातील १० वर्षांच्या एका मुलीने न घाबरता घरी पोहोचताच आपल्या आईला घडलेला सर्व प्रकार सांगितला. मुलीने दाखवलेल्या या धैर्यामुळे हा गंभीर गुन्हा उघडकीस आला. या घटनेबाबत माहिती देताना एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जामदार यांनी सांगितले की, पालकांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने हालचाली करत आरोपी दिनेश चौधरी याला ताब्यात घेतले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपीचा त्या सोसायटीतील कामाचा तो पहिलाच दिवस होता. यापूर्वी त्याने एका सिक्युरिटी एजन्सीमध्ये काम केले आहे. सोसायटीच्या सुरक्षिततेसाठी नेमलेल्या व्यक्तीकडूनच असे कृत्य घडल्याने पालकांमध्ये भीतीचे आणि संतापाचे वातावरण आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पुढील तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करत आहेत.

## २३ मोटारपंप जप्त; पीसीएमसीची कारवाई

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील तापमानाचा पारा चाळीशी जवळ गेल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. शहरासह उपनगरात अपुरा पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारींमध्ये सातत्याने वाढ होऊ लागली आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने नळाला थेट विद्युत मोटारपंप लावून पाणी खेचणाऱ्या पिंपळे निलखमध्ये 14, थेरगाव येथील पवारनगर, पडवळनगरमध्ये 9 अशा एकूण 23 विद्युत मोटारपंप जप्त करण्यात आल आहेत. चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी, भोसरी, डुडुळगाव, थेरगाव, दापोडी, सांगवी, पिंपळे गुरव, काळेवाडी, प्राधिकरण, काळेवाडी, किवळे, वाल्हेकरवाडीसह शहराच्या विविध भागात पाणीपुरवठा विस्कळीत असल्याच्या तक्रारी येत आहेत. विस्कळीत, अपुरा, अवेळी पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली आहे. नागरिकांनी गाड्या धुणे, अंगणामध्ये, रस्त्यावर पिण्याचे पाणी मारणे, जिने धुणे, झाडे व बागेस पाणी घालणे टाळावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने वारंवार करण्यात येत आहे. नागरिक नळजोडास थेट विद्युत पंप लावून मोठ्या प्रमाणात पाणी खेचतात. त्यामुळे परिसरातील इतर नागरिकांना पुरेसा प्रमाणात पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. यावर आळा बसविण्यासाठी तसेच, तक्रारीचे निरसन करण्यासाठी पिंपळे निलख परिसरात 14, थेरगाव येथील पवारनगर व पडवळनगरमध्ये 9 अशा एकूण 23 मोटार पंप जप्त करण्यात आल्या आहेत.

## पिंपरी-चिंचवडमध्ये अपघाताचा धोका वाढला

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपरी-चिंचवड शहरातील अनेक रस्त्यांवर स्टॉम वॉटर लाईन, ड्रेनेज चेंबर आणि गटारांची झाकणे तुटलेली अथवा उघडी असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रशासनाकडून तात्काळ दुरुस्ती केली जात नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

एखाद्या ठिकाणी खड्डा पडला किंवा झाकण तुटले की त्यावर कायमस्वरूपी उपाय करण्याऐवजी झाडांच्या फांद्या, मोठे दगड किंवा बॅरिकेड ठेवून केवळ दिखाऊ उपाययोजना केल्या जात आहेत. शहरातील मुख्य रस्ते, अंतर्गत मार्ग तसेच वर्दळीच्या चौकांमध्ये ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.

अनेक ठिकाणी वळणावरच उघडी चेंबर्स किंवा तुटलेली झाकणे असल्याने वाहनचालकांना अचानक ब्रेक मारावा लागतो. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात ही ठिकाणे लक्षात न आल्याने अपघाताचा धोका अधिक वाढतो. दुचाकीस्वार, सायकलस्वार आणि पादचारी नागरिकांसाठी तर हे जीवघेणे ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

रस्त्यावर उघडी चेंबर्स, तुटलेली झाकणे आणि त्याकडे होणारे दुर्लक्ष यामुळे अपघात झाल्यास जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. एखादा मोठा अपघात किंवा जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

**काही ठिकाणी दुरुस्ती केली तरी दगड किंवा फांद्या ठेवून धोक्याचा इशारा दिला जातो; मात्र बॅरिगेट्स, रिफ्लेक्ट होणारे रीडिंग लावणे आवश्यक असते. काही ठिकाणी तर दुर्घटना घडू नये म्हणून ठेवलेल्या फांद्यादेखील बाजूला गेल्याने तेथून प्रवास करणाऱ्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.**

**अदित्य खैरनार, स्थानिक नागरिक**

# मोशी-चिखलीत एमएनजीएल गॅस पाईपलाईन रखडली

**नागरिकांना सिलिंडरची झळ : चार वर्षांपासून जोडणीच नाही; अर्धवट कामामुळे नागरिकांचा संताप, प्रशासनाकडून लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन**



आजच्या गॅसटंचाईचा नागरिकांना त्रास झाला नसता जर वेळेत जोडणीकामे झाली असती, तर या कामासाठी आमचाही पाठपुरावा सुरू आहे. काही ठिकाणी खोदकामे केली आहेत. काही ठिकाणी लाईन पूर्ण झाली; मात्र मुख्य लाईन जोडली नसल्याने गॅसपुरवठा नाही. अशा अनेक तक्रारी आहेत. मोजक्याच ठिकाणी म्हणजेच स्पाईन सिटी, प्रभाग 6 मोशी प्राधिकरण ठिकाणी कामकाज झाल्याचे दिसते, पण बाकी ठिकाणी कामे रखडलेली आहेत. लवकरात-लवकर ही कामे मार्गी लागणे आवश्यक आहे.

**- सुजाता बोराटे, नगरसेविका**

गेल्या 4 वर्षांपासून आम्ही गॅस पाईपलाईनच्या प्रतीक्षेत आहोत. सोसायट्यांत पाईपलाईन टाकून 4 वर्षे झाली. मात्र, मुख्य वाहिनी नसल्याने ही केवळ शोभेची वस्तू झाली आहे. प्रशासनाने हे काम तातडीने पूर्ण करणे गरजेचे आहे.

**- प्रतिभा चौधरी, गृहिणी**

**पिंपरी (दै. संध्या)**

शहरात एलपीजी गॅसला पर्याय म्हणून महाराष्ट्र नॅशनल गॅस लिमिटेडच्या (एमएनजीएल) वतीने भूमिगत वाहिनीचे जाळे विस्तारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

मात्र, चिखली आणि मोशी परिसरातील अनेक सोसायट्यांमध्ये हे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

विशेष म्हणजे, अनेक सोसायट्यांच्या अंतर्गत भागात पाईपलाईन टाकून चार वर्षे उलटली तरी मुख्य वाहिनीशी जोडणी न झाल्याने या वाहिन्या केवळ शोभेच्या वस्तू ठरत आहेत. यामुळे आजच्या गॅसटंचाईच्या काळातही नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत असून, सिलिंडरसाठी रांगा लावण्याची वेळ आली आहे. चिखली-मोशी परिसरातील रहिवाशांच्या मते, एमएनजीएलच्या अधिकाऱ्यांकडून तांत्रिक अडचणीचे कारण सांगून केवळ वेळकाढूपणा केला जात आहे.

अनेक ठिकाणी खोदकाम करून इमारतींच्या परिसरात गॅस वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, परंतु मुख्य वाहिनीचा पुरवठा अद्याप जोडलेला नाही. चिखली परिसरातील कृष्णानगर, पाटीलनगर यांसारख्या भागांत ड्रेनेज आणि रस्त्यांच्या कामांमुळे आधीच रस्ते उखडलेले असताना, गॅस वाहिनीच्या अर्धवट कामामुळे पदपथाचीही दुरवस्था झाली आहे. पावसामुळे या कामात अधिक अडथळे येत असून, खोदलेल्या ठिकाणी राडारोडा तसाच पडल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. मोशीतील काही सोसायट्यांमध्ये 70 ते 80 टक्के घरांपर्यंत गॅस पोहोचला असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला तरी, अद्याप 30 टक्क्यांहून अधिक कुटुंब या सुविधेपासून वंचित आहेत.

चिखली-मोशी भागातील जवळपास 60 ते 70 टक्के कामे पूर्ण झाली असून, काही ठिकाणी महापालिकेची विकासकामे सुरू असल्यामुळे तांत्रिक अडचणी येत असल्याचे एमएनजीएल अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

येत्या दीड-दोन महिन्यांत या कामाला गती देऊन प्रलंबित जोडण्या पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन जिथे रस्त्यांचे नुकसान झाले आहे. तिथे दुरुस्तीचे कामही लवकरच हाती घेतले जाईल, अशी ग्वाही अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# तुंगार्ली हिल परिसरातील ओढ्यावर अतिक्रमणाचा प्रयत्न हाणून पाडला

**लोणावळ्यात पाईल फुटिंगचे काम थांबवले; ओढा पूर्ववत करण्याचे आदेश, हरित लवादात जाण्याचा इशारा**

**लोणावळा (दै. संध्या)**



लोणावळा शहरातील तुंगार्ली प्रिच्छली हिल भागातून जाणाऱ्या मोठ्या ओढ्याच्या पात्रात अतिक्रमण करून ते गिळंकृत करण्याचा प्रयत्न नगर परिषदेने उधळून लावला. एलिको बिल्डर्स अँड डेव्हलपर्स यांच्याकडून ओढ्यात पाईल फुटिंगचे काम सुरू करण्यात आले होते.

याप्रकरणी लोणावळा नगर परिषदेने कडक भूमिका घेत संबंधित बांधकाम व्यावसायिकाला काम थांबविण्याचे आणि ओढा पूर्ववत करण्याचे आदेश दिले आहेत. तुंगार्ली धरणापासून खंडाळ्यापर्यंत पाणी वाहून नेणारा एक महत्त्वाचा मोठा ओढा आहे. तुंगार्ली, गोल्ड व्हॅली आणि प्रिच्छली हिल भागातील पावसाचे पाणी याच मार्गाने वाहते.

मात्र, एलिको बिल्डर्सकडून या ओढ्याच्या पात्रात संरक्षण भिंत बांधण्यासाठी पाईल फुटिंग घेण्याचे काम सुरू करण्यात आले. यामुळे ओढ्याचे नैसर्गिक पात्र निम्म्याने कमी होऊन पावसाळ्यात शेजारील सोसायट्यांना, विशेषतः प्रीतीनगर सोसायटीच्या सुरक्षा भिंतीला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, 2013 साली देखील याच बिल्डरने या ओढ्यात बांधकाम करण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळीही नगरपरिषदेने त्यांना नोटीस बजावून 15 मीटरची मर्यादा पाळण्याचे आदेश दिले होते. तब्बल 13 वर्षे हे काम बंद होते. मात्र, आता पुन्हा एकदा शासनाची दिशाभूल करत हे अतिक्रमण सुरू करण्यात आल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

नगर परिषदेने नोटीस देऊन 15 दिवस उलटले तरी अद्याप पाईल फुटिंगच्या लोखंडी सळ्या आणि इतर साहित्य ओढ्यातच पडून आहे. नगर परिषदेने केवळ नोटीस न देता कठोर कारवाई करावी, अन्यथा आम्ही राष्ट्रीय हरित लवादाकडे न्याय मागू, असा इशारा प्रीतीनगर सोसायटीच्या सदस्यांनी पत्रकार परिषदेत दिला.

प्रीतीनगर सोसायटीच्या सदस्यांनी या अनधिकृत बांधकामाविरोधात आवाज उठवला. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या निदर्शनास हा प्रकार आणून दिल्यानंतर त्यांनी तातडीने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आणि नगर परिषदेला तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. आमदारांच्या या सूचनेनंतर नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित स्थळाची पाहणी करत अतिक्रमण झाले असल्याचे नमूद करत काम थांबवले आहे. आमदारांच्या या तत्परतेबद्दल सोसायटीधारकांनी त्यांचे आभार मानले. 24 एप्रिल 2026 रोजी नगररचना विभाग आणि बीट अधिकाऱ्यांनी स्थळ पाहणी केली. यामध्ये ओढ्याच्या पात्रात नियमांचे उल्लंघन करून बांधकाम होत असल्याचे स्पष्ट झाले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भामा इंग्लिश मिडियम स्कूलचा 97.14 टक्के निकाल

चाकण (दैनिक संध्या) : स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेच्या येथील भामा इंग्लिश मिडियम स्कूलचा इयत्ता दहावीचा शेकडा निकाल ९७.१४ टक्के लागला. मिताली बिरजू चव्हाण हिने ९२.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. वेदांत बाळू दौंडकर याने ९०.२० टक्के गुण मिळवून द्वितीय, तर रिदा राजू सिकिलकर हिने ९० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यालयाच्या गुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थिनींनी विशेष उल्लेखनीय कामगिरी करत बाजी मारली. यशस्वी विद्यार्थ्यांचे स्व.गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, ओंकार गोरे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, मुख्याध्यापिका प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, व्यवस्थापक ज्योती अनाप, प्रेरणा काळे, सविता कुमकर आदींनी कौतुक केले. विषय शिक्षक नंदा जैद, वंदना बकाल, गोस्वामी गणेश, नम्रता शेटे आदींचे गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

### जमिनीच्या पैशांच्या वादातून मारहाण; सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

उरुळी कांचन (दैनिक संध्या) : पुणे जिल्ह्यातील उरुळी कांचन (ता. हवेली) येथे वडिलोपार्जित जमिनीच्या विक्रीतून मिळालेल्या पैशांच्या देवाणघेवाणीच्या वादातून मारहाणीची घटना घडली असून सहा जणांविरोधात उरुळी कांचन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी योगेश विलास ननावरे (वय ३८, व्यवसाय शेती धंदा, रा. बगाडेवस्ती, प्रयागधाम रोड, उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार उरुळी कांचन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना शनिवार (ता. ९ मे) रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास बगाडेवस्ती येथील फिर्यादी यांच्या लेडीज शॉपी दुकानात घडली. फिर्यादी योगेश ननावरे हे दुकानात काम करत असताना वडिलोपार्जित जमिनीच्या विक्रीतून मिळालेल्या पैशांच्या कारणावरून आरोपींमध्ये वाद झाला. या प्रकरणातील आरोपींमध्ये अर्थव गणेश ननावरे, प्रथमेश गणेश ननावरे, गणेश विलास ननावरे, आदीत्य शरद कदम, दिपाली शरद कदम आणि अलका गणेश ननावरे यांचा समावेश आहे. सर्व आरोपी हे नातेवाईक असल्याचे समोर आले आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून फिर्यादी व त्यांच्या पत्नीला शिवीगाळ व मारहाण केली. तसेच आरोपींनी हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून त्यांना जमिनीवर पाडले. यावेळी आरोपी आदीत्य शरद कदम याने सिमेंटच्या डंबेलने फिर्यादी यांच्या नाकावर वार करून दुखापत केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार दत्तात्रेय गाडेकर करीत आहेत.



### पाटस रेल्वे स्थानकावर जीवघेणा प्रसंग; मालगाडीखाली झोपून महिलेने वाचवला जीव

पाटस (दैनिक संध्या) : दौड तालुका पाटस रेल्वे स्थानक परिसरात शनिवार दिनांक 9,मे रोजी सकाळी 8 वाजता एक धक्कादायक पण तितकाच दिलासा देणारा प्रकार घडला. रेल्वे रुळ ओलांडत असताना अचानक मालगाडी येऊ लागल्याने एका महिलेने प्रसंगावधान राखत थेट गाडीखाली झोपून स्वतःचा जीव वाचवला. मिळालेल्या माहितीनुसार, स्थानक परिसरात पादचारी पूल आणि सुरक्षित मार्गांच्या अभावामुळे नागरिक अनेकदा थेट रेल्वे रुळ ओलांडतात. शनिवारी सकाळी एक महिला रुळ ओलांडत असताना अचानक मालगाडी सुरू झाल्याने ती गोंधळून गेली. आसपासच्या नागरिकांनी ओरडून तिला सावध करण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून महिलेने तात्काळ निर्णय घेत गाडीखाली झोप घेतली. सुदैवाने, ती पूर्णपणे सुरक्षित राहिली. हा प्रसंग पाहून स्थानक परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर महिला कानगाव खोर पट्टा येथील होती उपस्थित नागरिकांनी रेल्वे प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. “दररोज हजारो प्रवासी जीव मुठीत धरून रुळ ओलांडतात. पादचारी पूल आणि इतर सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात,” अशी मागणी नागरिकांनी केली.

### खालुंब्रे येथे व्यवसायिकाच्या अंगावर गाडी घालून जीवे मारण्याचा प्रयत्न, दोघांना अटक

चाकण (दैनिक संध्या) : खालुंब्रे (ता.खेड) येथे जमिनीच्या वादातून इसमाच्या अंगावर भरधाव कार घालून त्याला जीवे मारण्याचा मंगळवारी(दि.६) रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून,संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. याप्रकरणी किरण बबन शिंदे(वय.३८,रा.खालुंब्रे) यांनी उत्तर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून खंडू बापू पवार,पोपट बापू पवार(दोघे रा.खालुंब्रे) यांच्यावर गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.तर एका अनोळखी इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी किरण शिंदे हे आपल्या घराकडे जात असताना दबा धरून बसलेल्या आरोपींनी शिंदे येण्याची वाट पाहिली. शिंदे घराजवळ पोहोचताच आरोपींनी भरधाव वेगाने मारुती स्विफ्ट कार त्यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला.मात्र, प्रसंगावधान राखत शिंदे यांनी बाजूला उडी घेतल्याने त्यांचा जीव थोडक्यात बचावला. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला असून, त्यामध्ये कार थेट अंगावर घालण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसत आहे. घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जमिनीच्या वादातून थेट जीव घेण्याचा प्रयत्न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

### आंबेगाव : शेतमजुरांच्या संसाराला आग !

मंचर (दैनिक संध्या) : लांडेवाडी (ता.आंबेगाव) येथे डोंगराला लागलेल्या आगीमुळे शेतमजुराच्या दोन झोपड्यांसह गोठा जळून खाक झाला. या घटनेत सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाले असून दोन महिलांच्या प्रसंगावधानामुळे दोन बालकांचे प्राण वाचल्याने मोठी दुर्घटना टळली. ही घटना शनिवारी (ता. ९) दुपारी घडली. लांडेवाडी येथील दर्यावस्ती परिसरात लागलेल्या आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केले. गुलाब वसंत केवाळे यांच्या गोठ्यात ठेवलेले शेतीसाठी लागणारे साहित्य, जनावरांच्या चाऱ्याची पोती, घरगुती वस्तू तसेच इतर साहित्य आगीत भस्मसात झाले. तसेच सागर दादाभाऊ केदारी यांच्या झोपडीचेही मोठे नुकसान झाले असून झोपडीत ठेवलेल्या संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्या.

# गुळुंचे श्री ज्योतिर्लिंग देवस्थान विश्वस्त मंडळ स्थापन

**ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात बैठक संपन्न; २१ जणांच्या विश्वस्त मंडळाची निवड**



नीरा (दै. संध्या)

गुळुंचे (ता. पुरंदर) येथील प्रसिद्ध श्री ज्योतिर्लिंग देवस्थानच्या व्यवस्थापनासाठी स्वतंत्र विश्वस्त मंडळ स्थापन करण्याच्या दृष्टीने आयोजित ग्रामस्थांची बैठक रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. मंदिर परिसरात झालेल्या या बैठकीस गावातील तसेच पंचक्रोशीतील शेकडो ग्रामस्थांनी उपस्थित राहून नव्याने स्थापन करण्यात आलेल्या विश्वस्त मंडळाला एकमताने अनुमोदन दिले.

बैठकीत देवस्थानच्या पारदर्शक व सक्षम व्यवस्थापनासाठी २१ जणांचे विश्वस्त मंडळ स्थापन करण्यात आले. यामध्ये अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार तसेच प्रसिद्ध प्रमुख या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी गुळूंचे गावचे तंटामुक्ती अध्यक्ष रमेश निगडे, श्री ज्योतिर्लिंग देवस्थान जिर्णोद्धार समितीचे अध्यक्ष गोरख भाऊ निगडे, ज्योतिर्लिंग यात्रा कमिटीचे प्रमुख पंच हनुमंत निगडे, जेष्ठ नागरिक विलास निगडे, अक्षय निगडे, सचिन निगडे, किशोर गोरगल यांसह उपस्थित ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात व श्री ज्योतिर्लिंग महाराज की जय.. हर भोले हर.. हर.. महादेवाच्या जयघोषात नव्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत करत देवस्थानच्या विकासासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

श्री ज्योतिर्लिंग देवस्थान हे शासनाच्या ‘ब’ वर्ग देवस्थानामध्ये समाविष्ट असून यात्रेदरम्यान लाखो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. मंदिर परिसराचा विकास, भाविकांसाठी आवश्यक सुविधा आणि धार्मिक परंपरांचे जतन यासाठी सक्षम व्यवस्थापन समितीची मागणी अनेक वर्षांपासून होत होती. त्यानुसार आता या प्रक्रियेला अधिकृत स्वरूप मिळाले आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांसह सर्व विश्वस्तांची नोंद सोमवारी पुणे जिल्हा धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून देवस्थानच्या विकासकामांना आता गती मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. शेकडो नागरिक उपस्थित साधकबाधक चर्चा करण्यात आली. या सभेचे प्रास्ताविक गिरीश निगडे यांनी केले, तर आभार ज्ञानेश्वर निगडे यांनी मानले.

## पिस्तूल व जिवंत काडतुसासह तरुणास अटक



चाकण (दै. संध्या)

विनापरवाना देशी बनावटीचे पिस्तूल आणि जिवंत काडतूस जवळ बाळगणाऱ्या एका तरुणाला चाकण पोलिसांनी जेरबंद केले. येथील पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून ५० हजार रुपये किमतीचे एक देशी बनावटीचे पिस्तूल एक हजार रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस असा एकूण ५१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. प्रवीण अशोक प्रधान (वय - २२, रा. महात्मा फुले नगर, चाकण.) असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. चाकण पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई महेश कोळी यांनी याप्रकरणी चाकण उत्तर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. दरम्यान, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गावठी कट्टे, पिस्तूल बाळगणाऱ्या अनेक तरुणांना मागील काही दिवसात वेगवेगळ्या कारवायांमध्ये पोलिसांनी गजाआड केले आहे. चाकण भागात गेल्या काही वर्षांमध्ये वाढत्या औद्योगिकीकरणामुळे परराज्यातून रोजगाराच्या नावाखाली गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारी मंडळी दाखल झाली आहेत. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यातील काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मंडळीकडून घातक शस्त्रे व गावठी कट्टे पुरवले जात असल्याचे समोर आले आहे.

## माहूर विद्यालयाचा सलग ७ वर्षे १००% निकाल : यंदाही मुलींनीच मारली बाजी

काळदरी (दै. संध्या)







श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेच्या माहूर माध्यमिक विद्यालय , माहूर या विद्यालयाने इयत्ता 10वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करत 100% टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखली आहे.

जगताप सई अनिल हिने 88.%टक्के गुणांसह प्रथम क्रमांक (84%) द्वितीय, कुंभार सई वैभव (83%) जाधव सानिका शंकर हिने तृतीय क्रमांक पटकावला.

या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक श्री हनुमंत पवार यांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. “परिश्रम, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यशाची हमी देतात,” असे ते म्हणाले.

या यशामागील खरे शिल्पकार म्हणून सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेचे अध्यक्षा आनंदीकाकी जगताप, पश्चिम महाराष्ट्र भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस व संस्थेचे सचिव, माजी आमदार संजयजी चंदूकाका जगताप, भारतीय प्रशासन सेवा अधिकारी व संस्थेचे विशेष सल्लागार डॉ. राजेंद्रबापू जगताप, संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. एम. एस. जाधव, सहसचिव दत्तात्रय गवळी, संस्थेच्या समन्वयिका सोनालीताई शिंदे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा वं संस्थेच्या विश्वस्त सौ. राजवर्धनीताई जगताप,भारती विद्यापीठाच्या संचालिका व संस्थेच्या विश्वस्त डॉ. अस्मिताताई जगताप, व्यवस्थापक कानिफनाथ अमराळे व रवींद्र पंत जगताप यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयातील सर्व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. विद्यालयातील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे आणि पालकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

इयत्ता 10वीचा निकाल 100 %लागला आहे इयत्ता 10 वी परीक्षेसाठी 24 विद्यार्थ्यांनी फॉर्म भरले होते परीक्षेसाठी 24 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.

विशेष प्राविण्यश्रेणीमध्ये 10 विद्यार्थी,प्रथम श्रेणीमध्ये 07विद्यार्थी, द्वितीय श्रेणीमध्ये 05विद्यार्थी व पास श्रेणीमध्ये 02विद्यार्थी एकूण 24 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत . विद्याल्यातील शिक्षक रामप्रभू पेटकर , महेंद्र भोसले , इंद्रभान पठारे , रामचंद्र जगताप , विकास राऊत , स्नेहलता बोरावके ,लता गायकवाड , त्याचप्रमाणे जीवन कड ,मंगल जगताप , श्रीकांत खोमणे , रामभाऊ कुंभार , श्रीकांत गव्हाणे व ग्रामस्थांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## लग्नाच्या गडबडीतही शिक्षणाला प्राधान्य; प्रियंका पोळ हिचा प्रेरणादायी आदर्श

यवत (दै. संध्या)



लग्न म्हणजे प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील महत्त्वाचा आणि भावनिक क्षण. लग्नाच्या तयारीत, रुढी-परंपरा आणि विविध कार्यक्रमांमध्ये अनेकदा शिक्षण किंवा करिअर मागे पडते. मात्र वडगाव दरेकर (ता. दौंड, जि. पुणे) येथील प्रियंका पोळ हिने या सर्व गोष्टींना बाजूला ठेवत शिक्षणाला प्राधान्य देत एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

प्रियंका पोळ ही बी.एड. द्वितीय वर्षाचे शिक्षण घेत असून तिचे वार्षिक परीक्षा सत्र २८ एप्रिल ते ५ मे २०२६ या कालावधीत सुरू होते. तिचे परीक्षा केंद्र पाटस येथील सुभाष अण्णा कुल अध्यापक विद्यालय येथे होते. याच दरम्यान १ मे २०२६ रोजी तिचा विवाह दौंड येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

**“आधी शिक्षण... मग बाकीचं काही!”**

> “लग्न हा आयुष्यातील महत्त्वाचा क्षण आहे, पण शिक्षण हे भविष्यासाठी तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे लग्नाच्या गडबडीतही मी परीक्षेला प्राधान्य दिले. प्रत्येक मुलीने आधी स्वतःच्या शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे.”
> - प्रियंका पोळ

लग्नाची धावपळ, नातेवाईकांची गर्दी आणि पारंपरिक विधी यामध्ये अनेक जणी शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात; मात्र प्रियंका हिने आपल्या करिअरला महत्त्व देत परीक्षेला प्राधान्य दिले.

लग्नाच्या कालावधीत असलेल्या विविध रुढी-रीती आणि परंपरा यांना मर्यादित ठेवत तिने नियमितपणे परीक्षा दिल्या.

विशेष म्हणजे लग्नानंतरही तिच्या शिक्षणासाठी तिचे पती प्रशांत यांनी तिला मोलाची साथ दिली. ते स्वतः प्रियंकाला परीक्षा केंद्रावर घेऊन जात होते आणि अभ्यास व परीक्षेसाठी सातत्याने प्रोत्साहन देत होते. त्यामुळे “शिक्षण आणि संसार यांचा समतोल साधता येतो” हा सकारात्मक संदेश या दाम्पत्याने समाजासमोर ठेवला आहे.

प्रियंका पोळ हिच्या या जिद्दीचे आणि शिक्षणाप्रती असलेल्या निष्ठेचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून अनेक तरुणींना तिच्याकडून प्रेरणा मिळत आहे.

## जय मल्हार बांधकाम कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी नगरसेवक योगेश जगताप

जेजुरी (दै. संध्या)



**■ सर्वसाधारण सभेत मतदान प्रक्रियेतून झाली निवड**

येथील जयमल्हार बांधकाम कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्षपदी नगरसेवक योगेश रोहिदास जगताप यांची निवड करण्यात आली. संस्थापक सचिन कापडे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.९) जेजुरी येथे असोसिएशनची बैठक पार पडली यामध्ये १००हुन अधिक सदस्य उपस्थित होते .यामध्ये मतदान प्रक्रियेतून अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली . राष्ट्रवादी (अजित पवार गट) चे नगरसेवक योगेश जगताप यांना बहुमत मिळाले . यावेळी असोशिएशनचे कामकाज संविधानिक करणार असून पुढील काळात संस्थेचे अद्ययावत कार्यालय करणार असल्याचे जगताप यांनी सांगितले. कार्यकारिणी पुढील प्रमाणे - उपाध्यक्ष -मंदार शिंदे ,सोमनाथ मदने ,कार्याध्यक्ष -शुभम चव्हाण , दत्ता चलवादी , सचिव -सागर खोमणे ,सहसचिव -ओंकार चौगुले , खजिनदार - बाळासाहेब पवार ,प्रीतम जाधव

## संग्रामदुर्ग किल्ल्यातील शिवसंस्कार शिबिराची उत्साहात सांगता



चाकण (दै. संध्या)

मुला मुलींना स्वसंरक्षण सक्षम बनवणे व निर्व्यसनी जीवन चारित्र्य निर्माण करण्यासाठी चाकण येथील संग्राम दुर्ग किल्ल्यात आयोजित करण्यात आलेल्या शिवसंस्कार शिबिराची उत्साहात सांगता करण्यात आली. किल्लेदार फिरंगोजी नरसाळा स्मारक प्रतिष्ठानचे संस्थापक - अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. मुला - मुलींना स्वसंरक्षण सक्षम बनवणे, साहसी व निर्भीड वृत्ती निर्माण करणे, शारीरिक, मानसिक दृष्ट्या सक्षम करणे, स्वयंशिस्त व व्यायामाची सवय लावणे, भारतीय हिंदू संस्कृती, परंपरा, देव, देश, धर्म यांचे संस्कार करणे, योग्य दिनचर्या, निर्व्यसनी जीवन चारित्र्य निर्माण करणे ही या शिबिराची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली. समारोपाला दुर्ग अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या दुर्ग अभ्यास सहलीमध्ये योगासन, प्राणायम, ध्यानधारणा, शिवकालीन युद्ध कला, भारतीय मर्दानी खेळ, लेझीम व शिवसंस्कार कथेचे आयोजन केले होते. चाकण नगरपरिषद हद्दीतील मुला मुलींनी या शिवसंस्कार शिबिराचा लाभ घेतला असल्याचे ॲड. किरण झिंजुरके यांनी सांगितले.

# चाकण बाजारात कांदा, टोमॅटो, कोबी व हिरव्या मिरचीची भरपूर आवक

चाकण (दै. संध्या)



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, टोमॅटो, कोबी, हिरवी मिरची व वांग्याची भरपूर आवक झाली. फळभाज्यांसह पालेभाज्यांची भरपूर आवक होऊनही भाव कडाडले आहेत. एकूण उलाढाल ७ कोटी रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ६ हजार ५०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ६०० ते १,३०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७५० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,३०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :

कांदा - एकूण आवक - ६,५०० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३. ६००. बटाटा - एकूण आवक - १,७५० क्विंटल.भाव क्रमांक १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - २७० क्विंटल (१,५०० ते २,००० रू.), कोबी - २३० क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २०५ क्विंटल (८०० ते १,००० रु.), वांगी - ७६ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), भेंडी - ५६ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), दोडका - ४६ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), कारली - ५२ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ४६ क्विंटल (५०० ते १,५०० रु.), काकडी - ९८ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - २० क्विंटल (१०,००० ते १५,००० रु.), वालवड - ४२ क्विंटल (२,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची - १४४ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ३२ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), वाटाणा - २० क्विंटल (६,००० ते ८,००० रू. ), शेवगा - ५० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), गाजर - १६० क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), गवार - ५२ क्विंटल (२,००० ते ४,००० रु. ), आले - १४५ क्विंटल ( २,००० ते ५,००० रु. ),.

# टेकवारी २.०: प्रशासनाला नाविन्यपूर्णतेचा ध्यास!

**महाराष्ट्राचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या मंत्रालयाने ४ ते ८ मे २०२६ या पाच दिवसांच्या कालावधीत एका सरकारी कार्यालयापलीकडे जाऊन एक वेगळेच स्थित्यंतर अनुभवले. या कालावधीत आयोजित टेकवारी २.० उपक्रम हा प्रशिक्षण, सहयोग आणि ऋणानुबंधाचा एक अनोखा प्रयोग ठरला. जिथे तंत्रज्ञान शासनाला भेटले, आरोग्य प्रशासनाशी जोडले गेले आणि संस्कृतीने नवकल्पनेशी सुंदर सोबत केली!**



शासनात आपण अनेकदा व्यवस्था, धोरण आणि प्रक्रियांबद्दल बोलतो. परंतु, टेकवारी २.० ने लोक, त्यांची मने, त्यांची मूल्ये, त्यांचे आरोग्य, त्यांची सर्जनशीलता आणि बदलत्या जगाशी जुळवून घेण्याची त्यांची इच्छाशक्ती याबद्दलच प्रशासन अंतिमतः कार्यरत असते, याची जाणीव करून दिली.

महाराष्ट्राच्या 'वारी' परंपरेतून प्रेरणा घेऊन, जिथे हजारो मंडळी भक्ती, शिस्त आणि ध्येयाने पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करतात, टेकवारीने तीच भावना प्रशासनात आणली आणि त्यातून हा 'लर्निंग वीक' (शिक्षण सप्ताह) नवविचारांची आधुनिक 'यात्रा' ठरला.

टेकवारी २.० चे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील समतोल. हा केवळ आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (AI) किंवा डिजिटल प्रशासनावरील उपक्रम नव्हता. त्याची रचना एक सर्वांगीण शिक्षण चळवळ म्हणून करण्यात आली होती. यामध्ये सायबर सुरक्षा, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि इंडिया स्टॅकपासून ते योगासने, तणाव व्यवस्थापन, पालकत्व आणि प्रशासनातील नैतिकता अशा विविध विषयांवरील सत्रांचा समावेश होता.

टेकवारी २.० मध्ये एका हॉलमध्ये अधिकारी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि AI-आधारित प्रशासनाच्या भविष्यावर चर्चा करत होते, तर दुसऱ्या हॉलमध्ये सहभागी मानसिक स्वास्थ्य, निकोप जीवन आणि भावनिक संतुलनाबद्दल शिकत होते. टेकवारी २.० मध्ये नाविन्यपूर्ण संकल्पना, आरोग्यदायी अन्न आणि पोषण दर्शविणारी प्रदर्शने देखील होती. या साऱ्यांमुळे मंत्रालयाचे 'त्रिमूर्ती प्रांगण' विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी, लय आणि ऊर्जेने भरून गेले होते.

भविष्यासाठी सज्ज असलेले प्रशासन केवळ तंत्रज्ञानावर उभारता येत नाही. त्यात सहानुभूती, आरोग्य, नैतिकता आणि सर्जनशीलता देखील अंतर्भूत असावी लागते. टेकवारीचे खरोखर लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे त्याची व्याप्ती आणि सर्वसमावेशकता. मंत्रालयात ६,००० हून अधिक कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात प्रत्यक्ष सहभाग घेतला, तर जिल्ह्या-जिल्ह्यांमधून लाखो कर्मचारी 'लाइव्ह स्ट्रीमिंग'द्वारे जोडले गेले. शिक्षणाच्या प्रवासात कोणताही कर्मचारी मागे राहू नये, ही साधी पण प्रभावी कल्पना त्यामागे होती.

निलेश परब आणि त्यांच्या टीमने सादर केलेले 'तालरंग' हे लयबद्ध उद्घाटन सादरीकरण खूप सुंदर वेगळेपणाने सादर झाले. प्रारंभी एक संगीत सादरीकरण वाटणारे नंतर प्रशासनाचे रूपक बनले. प्रत्येक वाद्याची एक भूमिका होती. प्रत्येक ताल समन्वयावर अवलंबून होता. प्रत्येक आवाजाप्रमाणेच प्रत्येक विरामालाही महत्त्व होते.

अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवरांनी हे समन्वयित सादरीकरण पाहिले तेव्हा त्यातील संदेश उलगडला. प्रशासन हे देखील एका ऑर्केस्ट्रासारखे (वाद्यवृंद) आहे. विविध विभाग, अधिकारी, संस्था आणि नागरिक यांच्यात सुसंवाद आणि समन्वय असल्याशिवाय सुशासन अशक्य आहे.

माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांच्यासह वरिष्ठ नेतृत्वाच्या सहभागाने शिक्षण आणि स्वीकार (Adaptation) ही प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावरील सामायिक जबाबदारी असल्याची कल्पना अधिक दृढ केली.

या सप्ताहाने तंत्रज्ञान क्षेत्रातील नेते, प्रशासक, आरोग्य तज्ज्ञ, कलाकार आणि प्रशिक्षकांना एकत्र आणले. एआय, सायबर सुरक्षा, DPDP कायदा २०२३, क्वांटम कॉम्प्युटिंग आणि डिजिटल प्रशासनावरील सत्रांनी प्रशासकीय परीघ किती वेगाने विस्तारित आहे हे प्रतिबिंबित केले. तर नैतिकता, नेतृत्व, टीकेस तोंड देणे आणि तणाव व्यवस्थापन यावरील चर्चांनी त्याला अर्थ प्राप्त करून दिला.

आज प्रशासकांकडून केवळ फाईल्स आणि धोरणे याबाबतच काम करण्याची अपेक्षा नाही, तर जनतेच्या अपेक्षा, डिजिटल परिवर्तन आणि भावनिक दडपण सांभाळण्याचीही अपेक्षा आहे. टेकवारीने ही वस्तुस्थिती प्रामाणिकपणे आणि संवेदनशीलतेने स्वीकारली.

कॅपॅसिटी बिल्डिंग कमिशन, यशदा (YASHADA), द योग इन्स्टिट्यूट, मनशक्ती, नॅसकॉम (NASSCOM) यांसारख्या संस्थांमधील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील धुरिणांच्या उपस्थितीने या उपक्रमाला एक उंची प्राप्त झाली.



टेकवारीचा सर्वात सुंदर पैलू म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आत्म्याशी जोडलेले त्याचे घट्ट नाते. 'नादरंग' आणि 'योगरंग' पासून 'कलारंग' आणि वारी संस्कृतीच्या अंतिम चित्रणापर्यंत, प्रत्येक संध्याकाळ ही आठवण करून देत होती की प्रगती म्हणजे परंपरांचा त्याग करणे नव्हे.

कला, एआय आणि प्रशासन यांवरील संवादांनी हा समतोल सुंदरपणे साधला. कलाकार, चित्रपट निर्माते आणि सर्जनशील मनांनी तंत्रज्ञान हे कल्पनाशक्ती आणि सांस्कृतिक ओळखीसह कसे बहरु शकते, याचा मनोज्ञ शोध घेतला.

ज्या काळात तंत्रज्ञानावरील चर्चा अनेकदा कोरड्या आणि यांत्रिक वाटतात, तिथे टेकवारीने नाविन्याला एक जिवंत मानवी चेहरा दिला. टेकवारी २.० हे केवळ सत्रांचे वेळापत्रक नव्हते. ते असे वातावरण होते जिथे अधिकारी शिकण्यासाठी थांबले; जिथे तंत्रज्ञानावर निर्भयतेने चर्चा झाली; जिथे आरोग्याला पर्यायी नव्हे तर अत्यावश्यक मानले गेले आणि जिथे प्रशासनाच्या केंद्रस्थानी संस्कृतीचा उत्सव साजरा झाला. या साऱ्यातून काही दिवसांसाठी मंत्रालय ही केवळ प्रशासकीय इमारत न राहता 'कुतूहलाचा परिसर' (Campus of Curiosity) बनली.

हा उपक्रम 'महा-साधना सप्ताहा'च्या माध्यमातून सुरू असलेल्या एका मोठ्या परिवर्तनाच्या प्रवासाचे प्रतिबिंब होता, जिथे नऊ लाख कर्मचाऱ्यांनी 'iGOT कर्मयोगी' प्लॅटफॉर्मवर संरचित शिक्षण पूर्ण केले आणि केवळ एका आठवड्यात ३५ लाख लर्निंग अवर्सची (शिकण्याच्या तासांची) विक्रमी नोंद केली. ही केवळ आकडेवारी नसून, शासन आणि त्याचे नेतृत्व आपल्या लोकांमध्ये जाणीवपूर्वक गुंतवणूक करत असल्याचे दर्शवते.

टेकवारीने अनेक प्रशासकीय सुधारणा आणि मानव संसाधन उपक्रमांवरही प्रकाश टाकला:

* MAHA eHRMS: महाराष्ट्राचे पहिले एकत्रित HR प्लॅटफॉर्म
* अनुकंपा नियुक्ती सुधारणा
* Small Bite, Big Leap सारखे छोटे डिजिटल शिक्षण उपक्रम
* सेवाकर्म आणि प्रशासन सुधारणा कार्यक्रम
* जलद आणि पारदर्शक प्रशासनासाठी भरती आणि सेवा नियमांमधील सुधारणा

टेकवारी २.० चे कदाचित सर्वात मोठे यश हे आहे की, त्याने आपल्याला आठवण करून दिली की शिक्षण कधीही संपत नाही, विशेषतः सार्वजनिक सेवेत. भविष्यातील प्रशासन केवळ अधिकार असलेल्यांचे नसेल, तर जे शिकण्यासाठी, जुळवून घेण्यासाठी, सहयोग करण्यासाठी आणि मानवी मूल्यांशी जोडलेले राहण्यासाठी तयार आहेत, त्यांचे असेल.

"तुझे नाव ओठी, तुझे रूप ध्यानी
जिवाला तुझी आस गा लागली
जरी बाप साऱ्या जगाचा परि तू
आम्हा लेकरांची विठू माऊली...
माऊली माऊली, माऊली माऊली
माऊली माऊली, रूप तुझे..."

हृदयात असलेली हीच भावना नेतृत्वाला सत्तेच्या माध्यमातून सहानुभूतीच्या भावनेत रूपांतरित करते. 'बाप' हा व्यवस्थेतील अधिकार, नियम आणि प्रशासनासाठी आवश्यक असलेल्या वस्तुनिष्ठ न्यायाचे प्रतिनिधित्व करतो, तर 'माऊली' ही सहानुभूती आणि सुलभतेचे प्रतिनिधित्व करते जी प्रशासनाला 'आत्मा' देते. सेवेत खरी उत्कृष्टता तेव्हाच येते जेव्हा एखादा प्रशासक आपल्या पदाच्या पलीकडे जाऊन एक 'कल्याणकारी पालक' होतो; हे सिद्ध करतो की सर्वात प्रभावी शासन हे दूरस्थ आदेशांद्वारे नाही, तर प्रत्येक नागरिकाच्या कल्याणासाठी असलेल्या पालनपोषण करणाऱ्या बांधिलकीतून जाणवत असते.

सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव श्रीमती व्ही. राधा (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेला 'टेकवारी २.०'चा उपक्रम महाराष्ट्र भविष्यासाठी सज्ज आहे आणि प्रशासन हे संस्कृती व करुणेशी असलेली नाळ कायम ठेवून शिकू शकते, विकसित होऊ शकते आणि नाविन्य आणू शकते, हा दिशादर्शक विचार रुजविण्यात खरोखरच यशस्वी ठरला!

**श्रीमती आर. विमला**
**(भा.प्र.से ), निवासी आयुक्त आणि सचिव, महाराष्ट्र शासन**
**(पीएचडी स्कॉलर, आयआयटी बॉम्बे)**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### पुणे सोलापूर महामार्गासह उरुळी कांचनमध्ये पुन्हा वाहतूक कोंडीचा विस्फोट

उरुळी कांचन (दैनिक संध्या) : पुणे–सोलापूर महामार्गावरील उरुळी कांचन (ता. हवेली) परिसरात वाहतूक कोंडीने पुन्हा डोके वर काढले असून नागरिक, व्यापारी आणि वाहनचालक अक्षरशः हैराण झाले आहेत. काही महिन्यांपूर्वी पोलिस प्रशासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे कोंडीचा प्रश्न मार्गी लागल्याचे चित्र होते; मात्र आता परिस्थिती पुन्हा जैसे थे झाली असून आठवड्याच्या शेवटी आणि रविवारी उरुळी कांचनमध्ये वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. पूर्वी पोलीस निरीक्षक शंकर पाटील यांनी वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरणारे प्रमुख चौक बंद करून पर्यायी वळण मार्ग उपलब्ध करून दिला होता. त्यामुळे काही काळ वाहतूक सुरळीत झाली होती. मात्र सध्या प्रशासनाचे दुर्लक्ष, वाढती वाहनसंख्या आणि बेशिस्त पार्किंगमुळे उरुळी कांचन पुन्हा वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकले आहे. विशेषतः शनिवार, रविवार आणि सुट्टीच्या दिवशी परिस्थिती अधिक गंभीर बनत आहे. रविवारी उरुळी कांचन येथे भरत असलेल्या आठवडे बाजारामुळे परिसरातील वीस ते पंचवीस गावांतील नागरिक बाजारासाठी मोठ्या संख्येने येथे येतात. परिणामी बाजारपेठ, नऊमोरी परिसर आणि अंतर्गत रस्त्यांवर वाहनांची प्रचंड गर्दी होत आहे. अनेक वाहनचालक रस्त्याच्या मधोमधच वाहने उभी करत असल्याने वाहतुकीचा पूर्ण बोजवारा उडत आहे. सायंकाळच्या वेळी बाजारपेठेत परिस्थिती अधिक बिकट बनते. व्यापारी वर्गालाही या कोंडीचा मोठा फटका बसत असून ग्राहकांना बाजारात पोहोचणे कठीण होत आहे. "दर रविवारीच नव्हे तर इतर दिवशीही सायंकाळी वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. या समस्येतून नागरिकांची सुटका कधी होणार?" असा संतप्त सवाल व्यापारी वर्गातून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, महामार्गालगत असलेल्या पेट्रोल पंपांवर इंधन भरण्यासाठी थेट महामार्गावर वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे मुख्य रस्त्यावर अडथळे निर्माण होऊन कोंडीत आणखी भर पडत आहे. स्थानिक नागरिकांना गावात ये-जा करण्यासाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अंतर्गत रस्त्यावर बेसिस्त पार्किंग मुळे ही वाहतूक कोंडी होते. स्थानिक नागरिक दत्तात्रेय महादेव कांचन यांनी सांगितले की, "पेट्रोल पंपासमोर महामार्गावरच वाहनांच्या रांगा लागतात. त्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होतो. रस्ता ओलांडताना जीव मुठीत घेऊन जावे लागते. वाहने थांबल्याने अपघाताचा धोका वाढला आहे." वाहतूक शाखा आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलून बेशिस्त पार्किंगवर कारवाई करावी, आणि महामार्गावरील आणि नऊ मोरी येथे वाहतूक नियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा उरुळी कांचनची वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे.

### दोन ग्रॅम सोन्यासाठी वृद्धेचा खून; करंजविहीरे येथील घटना

चाकण (दैनिक संध्या) : दोन ग्रॅम सोन्याच्या दागिन्यांसाठी चक्क एका ८० वर्षीय वृद्धेचा गळा दाबून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने मृतदेह प्लॅस्टिक गोणीत भरून भामानदी पात्रात फेकल्याचा संतापजनक प्रकार खेड तालुक्यातील करंजविहीरे येथे घडला. सिंधुबाई विठोबा मरगज (वय - ८०, रा. करंजविहीरे, ता. खेड) असे खून झालेल्या वृद्ध महिलेचे नाव आहे. समीर बाळू मरगज (वय - २७) यांनी याप्रकरणी उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार कैलास कुंडलिक मरगज (वय ३६, रा. करंजविहिरे ) याला बेड्या ठोकल्या आहेत.

## शिक्षक-शिक्षकेत्तर भरतीत बोगसपणाचा आरोप

**दौंड (दै. संध्या)**

■ दौंड तालुक्यातील नामांकित विद्यालयावर गंभीर आरोप; हायकोर्टात याचिका दाखल करण्याचा इशारा

दौंड तालुक्यातील एका नामांकित विद्यालयामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात बोगसपणा झाल्याची जोरदार चर्चा सुरू असून, शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. शासनाच्या नियमांना पायदळी तुडवत काही कर्मचाऱ्यांना सरकारी पेन्शन योजनेत बसविण्यात आल्याने शासनाची दिशाभूल झाल्याचा आरोप शिक्षक सचिन रुपनवर यांनी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित विद्यालयात काही पदे विनाअनुदानित तत्त्वावरील असताना देखील संबंधित कर्मचाऱ्यांना 2005 पासून नियुक्ती दाखवून शासनाच्या लाभासाठी पात्र करण्यात आल्याचा आरोप आहे. प्रत्यक्षात प्रतीक्षा भरती प्रक्रिया 2010 मधील असल्याचे सांगितले जात असून, मागील तारखांचे मस्टर तयार करून त्यावर सह्या घेतल्याचे पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे. या कथित बोगस भरतीमुळे शासनाचे लाखो रुपये पाण्यात जाण्याची शक्यता व्यक्त होत असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. संबंधित शिक्षण संस्था तसेच शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी व्हावी, अशी मागणी सचिन रुपनवर यांनी केली आहे. याबाबत लवकरच मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करण्यात येणार असल्याची माहिती देताना रुपनवर म्हणाले की, मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री आणि शिक्षण आयुक्त यांच्याकडेही रीतसर तक्रार दाखल केली जाणार आहे. तसेच बोगस मान्यता देणारे आणि या प्रकाराला सहकार्य करणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"अन्यायग्रस्त शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व न्यायालयीन लढाया लढणार असून, संबंधित प्रकरणाचा पाठपुरावा वरिष्ठ स्तरावर केला जाणार आहे," अशी भावना सचिन रुपनवर यांनी व्यक्त केली.

## 'जय श्रीराम'च्या जयघोषाने करवीरनगरीत रामराज्याचा जागर

**कोल्हापूर (दै. संध्या)**

■ विविध संप्रदाय, आध्यात्मिक संस्था यांचा सहभाग

■ सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या ८४ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने कोल्हापुरात भव्य हिंदू एकता दिंडी !




सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या ८४ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने देशभरात 'रामराज्य निर्माण अभियान' राबवण्यात येत आहे. त्या निमित्ताने साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेल्या आणि श्री महालक्ष्मी देवीच्या कृपेने पावन झालेल्या करवीर नगरीत १० मे २०२६ या दिवशी भव्य अशा हिंदू एकता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीच्या माध्यमातून रामराज्य म्हणजेच हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचे स्फुल्लिंग चेतवले गेले. या फेरीत वारकरी संप्रदाय, श्री संप्रदाय, 'भागिरथी महिला मंच', श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, 'इस्कॉन', भजनी मंडळ, भाजप, शिवसेना, पतित पावन संघटना, विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, हिंदु महासभा, चिन्मय मिशन, कोल्हापूर जिल्हा ब्राह्मण पुरोहित संघ यांसह विविध संप्रदाय, आध्यात्मिक संस्था यांसह मोठ्या संख्येने हिंदू सहभागी होते. या फेरीसाठी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये आणि पू. (कु.) दीपाली मतकर यांची वंदनीय उपस्थिती होती.

मिरजकर तिकटी येथे प्रसिद्ध व्यावसायिक श्री. जयंतीभाई पटेल यांच्या हस्ते धर्मध्वजाचे पूजन करण्यात आले. यानंतर मान्यवरांच्या हस्त सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले, श्री महालक्ष्मीदेवी आणि श्री जोतिबा देव यांच्या पालखीचे पूजन करण्यात आले. दिंडीत चारचाकी वाहनात असलेली छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिंडीचा उद्देश स्पष्ट केला. मिरजकर तिकटी, खरी कॉर्नर, महाद्वार रोड, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा (शिवतीर्थ) येथे दिंडीची सांगता झाली. दिंडीच्या समोर धर्मध्वज होता, तर मागे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे छायाचित्र, श्री महालक्ष्मी देवी आणि श्री जोतिबा देव यांचे छायाचित्र असलेली पालखी होती. दिंडी जात असतांना वाटेत धर्मध्वजाची आरती ओवाळून, तसेच पुष्पवृष्टी करून अनेकांनी स्वागत केले. समारोपप्रसंगी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये, श्री. अभय वर्तक, तसेच आरोग्यभारतीच्या वैद्या अश्विनी माळकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते 'सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे धर्मसेवकांना मार्गदर्शन', या मराठी भाषेतील ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

## प्रा. श्याम मानव यांचा 'बुवा तेथे बाया' हा कार्यक्रम रद्द करा !


**मुंबई (दै. संध्या)**



### हिंदु राष्ट्र समन्वय समितीची मागणी

हिंदु धर्म, हिंदूंचे संत आणि संघटना यांच्यावर सातत्याने अश्लाघ्य चिखलफेक करणारे अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव यांचे 'बुवा तेथे बाया' व्याख्यान हे दादर येथे होणार आहे. प्रा. श्याम मानव आणि अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीची वादग्रस्त पार्श्वभूमी पहाता ते निश्चितच हिंदु संतांविषयी अवमानजनक विधाने या व्याख्यानात करतील, याची आम्हाला खात्री आहे. त्यामुळे या व्याख्यानाला अनुमती नाकारावी, अशी मागणी हिंदु राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली असून या विषयीचे निवेदन शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात देण्यात आले. यावेळी निवेदन देतांना राष्ट्रीय वारकरी परिषदेचे कार्याध्यक्ष ह.भ.प. बापू महाराज रावकर, हिंदु जनजागृती समितीचे श्री. प्रसाद मानकर, धर्माभिमानी स्वाती पांडेय, विद्या हरपुडे, सर्वश्री केतन शेंडे, विशाल ठक्कर, संतोष हरपुडे, राहुल पाटकर, सनातन संस्थेचे श्री. चंद्रकांत भदिर्के उपस्थित होते. अनेक महिलांची फसवणूक करणाऱ्या अशोक खरात प्रकरणानंतर प्रा. श्याम मानव या प्रकरणाचा संदर्भ घेत सर्वच हिंदू बुवा अर्थात प्रवचनकार, संत यांच्यावर चिखलफेक करणारी विधाने करत आहेत. 'बुवा तेथे बाया' अशा प्रकारे नाव देऊन त्यांनी महिलांचाही अपमानच केला आहे. यातून सश्रद्ध महिलांना एकप्रकारे निर्बुद्ध समजून हे व्याख्यान देत आहेत. १२ मे या दिवशी सायं ५:३० वा. राजर्षी शाहू महाराज सभागृह, शिवाजी मंदिर, दुसरा मजला, दादर (प.) येथे हे व्याख्यान होत आहे. हिंदु धर्म, संत परंपरा यांविषयी द्वेष बाळगणारे मानव यांनी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने आयोजित जादूटोणा कायद्याच्या जनजागृती कार्यक्रमात 'ज्ञानेश्वरांनी रेड्यामुखी वेद वदवले', हे धादांत खोटे सांगितले जात आहे', ' १४ वर्षाचं कुलकर्ण्याचं पोर काय भिंत चालवणार?' अशा प्रकारची धार्मिक भावना दुखावणारी अनेक आक्षेपार्ह आणि जातीयवादी विधाने यापूर्वीही केली आहेत. हा पूर्वानुभव पाहता श्याम मानव आताही व्याख्यानात हिंदु संतांवर बेछूट टीका करतील, तरी असे झाल्यास कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती निर्माण होऊ शकते. महिला अंधश्रद्धेपोटी बाबा-बुवांच्या मागे लागतात, अशी सरसकट विधाने करणे, हा समस्त स्त्री-वर्गाचा अवमान आहे. एक प्रकारे स्त्रियांना चारित्र्यहीन ठरवण्याचा प्रयत्न ते करत आहेत. त्यामुळे या व्याख्यानाला अनुमती नाकारावी, असे आवाहन हिंदु राष्ट्र समन्वय समितीने केले आहे. जर हे व्याख्यान झाले आणि त्यात मानव यांनी आक्षेपार्ह विधाने केली, त्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीला पोलिस प्रशासन जबाबदार राहील, याची नोंद प्रशासनाने घ्यावी, असे हिंदू राष्ट्र समन्वय समितीने म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## जेजुरी गडावर खंडोबा मंदिरात आंबा महोत्सव

जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा मंदिरात येथील गुरव, घडशी, कोळी, वीर या खंडोबा देवाच्या पुजारी वर्गाकडून आंब्याची सजावट करून आंबा महोत्सव साजरा करण्यात आला. कुलदैवत खंडोबा देवाला दरवर्षी,बिल्वपत्र, दवणा,फळे,फुले, पाने,धान्य आदी सप्तपूजा केली जाते.रविवार दिनांक 10 रोजी जेजुरी येथील पुजारी संघटनेच्या वतीने आंब्याची पूजा करून आंबा महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी देवसंस्थानचे विश्वस्त ,अधिकारी ,कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## चलवादी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांचे दहावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, विद्यानगर येथील चलवादी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे. संस्थेच्या पुणे इंटरनॅशनल स्कूल आणि विश्वभारती माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा निकाल यंदाही उल्लेखनीय लागला आहे. विद्यालयाचा विद्यार्थी मयूर गव्हाणे याने ९४% गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. जानवी नवगिरे हिने ९१% गुणांसह द्वितीय, तर अरुण प्रजापती याने ८०.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. संस्थेच्या विश्वभारती माध्यमिक विद्यालयात आरोही धेंडे ७७% गुण मिळवून शाळेत प्रथम आली. बबलू राठोड ७६% गुणांसह द्वितीय, तर मल्लिका चलवादी ७५% गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. स्पर्धेच्या युगात जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील मुलांमध्ये असलेल्या प्रचंड गुणवत्तेला योग्य दिशा देण्याचे काम आमच्या शिक्षकांनी केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो,अशी भावना चलवादी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी व्यक्त केली. या यशाबद्दल संस्थेच्या उपाध्यक्षा ॲड. रेणुका चलवादी आणि सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शिर्के यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यानगर परिसरात विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात पुणे इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्य स्मिता लोंढे, व्यवस्थापिका सायली शिंदे, उपप्राचार्य अश्विनी मोहिते तसेच विश्वभारतीचे मुख्याध्यापक विजय गायकवाड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षिका ललिता धावणे, शिल्पा गायधने, तरन्नुम शेख, प्रमिला जाधव, रूपाली कचरे, संतोष जाधव आणि शिक्षक बाळासाहेब इमडे, किशोरी फुलसुंदर, नंदा सातपुते, ज्योती शेलकांदे, सुवर्णा गायकवाड यांच्यासह सर्व कर्मचारी वृंदाने विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी वर्षभर कठोर परिश्रम घेतले.

## जामखेड येथे 12 मे रोजी रोजगार मेळावा

पुणे (दैनिक संध्या) : पुणे येथील चाकण औद्योगिक परिसरातील ऑटोमोबाईल कंपनी लुमॅक्स इंडस्ट्रीजच्या वतीने जामखेड शहरात मंगळवारी (ता.१२) रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून तालुक्यातील बेरोजगार युवक-युवतींना नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे. उमेदवारांची मुलाखत घेऊन थेट निवड करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष विजयसिंह गोलेकर तसेच उद्योजक व कुसडगावचे माजी सरपंच बापूसाहेब कार्ले यांच्या पुढाकारातून हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. पंचायत समितीसमोरील जामखेड सेंट्रल कॉम्प्लेक्समधील बी. के. शिंदे महाविद्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुलाखती होणार आहेत. १० वी, १२ वी उत्तीर्ण, आयटीआय, कोणत्याही शाखेतील पदवीधर, तसेच बी. ई. व डिप्लोमाधारक उमेदवार पात्र असणार आहेत. तालुक्यातील जास्तीत जास्त तरुणांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विजयसिंह गोलेकर व बापूसाहेब कार्ले यांनी केले आहे.





# सासवड नगरपरिषदेच्यावतीने स्वच्छता महाअभियान

सासवड (दै. संध्या)

### प्रभाग ६ मध्ये लोकसहभागातून श्रमदान

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त सासवड नगरपरिषदेने शहरात एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. महिन्याच्या एका रविवारी शहरातील एका भागाची संपूर्ण स्वच्छता करण्याच्या या मोहिमेचा दुसरा टप्पा रविवारी प्रभाग क्रमांक ६ मध्ये उत्साहात पार पडला. यावेळी लोकप्रतिनिधी, नगरपरिषद प्रशासन आणि नागरिकांनी एकत्र येत श्रमदान केले.

या अभियानामध्ये माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांच्यासह उपनगराध्यक्ष मनोहर जगताप आणि गटनेते अजित जगताप यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून स्वच्छतेचा संदेश दिला. संत सोपानकाका महाराज समाधी मंदिर परिसर आणि संपूर्ण प्रभाग ६ मध्ये ही मोहीम राबवण्यात आली. शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्यासाठी सुरू झालेल्या या मोहिमेला नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नगरपरिषदेने या मोहिमेसाठी आपली संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित केली होती. यामध्ये १५० स्वच्छता दूत, १० घंटागाड्या, ८ ट्रॅक्टर आणि २ जेसीबीच्या सहाय्याने परिसरातील कचरा आणि घाणीचे साम्राज्य दूर करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणांसह अंतर्गत रस्ते आणि उपसा न होणाऱ्या कोपऱ्यांची यावेळी सखोल स्वच्छता करण्यात आली.

याप्रसंगी आरोग्य सभापती राजन जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत तसेच नगरसेविका स्मिता जगताप, प्रियांका जगताप, लिना वढणे आणि अर्चना जगताप उपस्थित होत्या. सासवड शहराचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी आणि स्वच्छतेची सवय लावण्यासाठी दर महिन्याला अशाच प्रकारे वेगवेगळ्या प्रभागांमध्ये हे अभियान राबवण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

## अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश

पुणे (दै. संध्या)

थकीत ऊसबिलासाठी सुरू असलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाला अखेर यश आले असून, ओंकार शुगर कारखाना प्रशासनाने १५ दिवसांत सर्व देयके अदा करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर संघर्ष समितीने आंदोलन तूर्तास २५ मेपर्यंत स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. पांगरी, लिंबुटा, टाकळी आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या एकजुटीमुळे हा लढा यशस्वी झाल्याची भावना ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने व्यक्त केली. थकीत ऊसबिल, तोडणी मजुरी, वाहतूक खर्च आणि कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याच्या मागणीसाठी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समितीने ओंकार शुगर्ससमोर सत्याग्रह आंदोलन सुरू केले होते. आंदोलन दुसऱ्या दिवशीही रात्री उशिरापर्यंत सुरू होते. दरम्यान, शेतकरी आक्रमक होत कारखान्याच्या वाहनांना अडवू लागल्याने प्रशासनावर दबाव वाढला. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन कारखाना प्रशासनाने शेतकऱ्यांच्या खात्यात १८०० रुपये प्रतिटन दराने रक्कम जमा करण्यास सुरुवात केली आहे.

## आ. हेमंत रासने यांच्यासह मान्यवरांनी केले मातृशक्तीला वंदन

पुणे (दै. संध्या)

प्रसंगी घरादाराकडे दुर्लक्ष करून समाजासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना खंबीर पाठिंबा देण्याचे कार्य त्यांच्या माता करीत असतात. त्या कार्यकर्त्यांना पदराखाली घेतात म्हणून कार्यकर्ता आपल्या संपूर्ण परिसरावर मायेचा आणि कार्याचा पदर पांघरू शकतो, असे प्रतिपादन आमदार हेमंत रासने यांनी केले. जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून जय गणेश व्यासपीठाच्या वतीने विघ्नहर्ता कार्यकर्ता मातृगौरव सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या




माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असलेल्या त्यांच्या मातांचा गौरव करण्यात आला. आमदार रासने यांच्यासह राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे, संत साहित्यिक डॉ. आरती दातार यांच्या हस्ते प्रसाद, महावस्त्र, सन्मानपत्र आणि तुळशीचे रोप देऊन मातांचा गौरव करण्यात आला. यावेळी युवराज निंबाळकर, उदय जगताप , शिरीष मोहिते ,विवेक खटावकर व राजा कदम मान्यवर उपस्थित होते, जय गणेश व्यासपीठ मधील पाच मंडळांचा सहभाग होता अखिल मंडई मंडळाचे विश्वास भोर , शनिवार पेठ येथील ओम हरिवेश्वर मित्र मंडळाचे अध्यक्ष राहुल जाधव, गुरुवार पेठ येथील वीर शिवराज मित्र मंडळाचे किरण सोनीवाल, बुधवार पेठ येथील साईनाथ मंडळ ट्रस्ट पियूष शहा, श्री शिवाजी मित्र मंडळाचे प्रल्हाद भाऊ थोरात यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी लोकांचे संघटन करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला.

स्वातंत्र्योत्तर काळात विकासाची फळे समाजाच्या तळागाळापर्यंत नेऊन सुराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न गणेशोत्सव मंडळांच्या माध्यमातून केला जातो. कार्यकर्ता हा या मंडळांचा कणा आहे आणि आपल्या मुलांचे संसार सांभाळून त्यांना समाजकार्यासाठी मोकळीक देणाऱ्या माता या निश्चितपणे वंदनीय आहेत.

## ‘लँड टायटलिंग ॲक्ट’ जुलैमध्ये लागू होणार; महाराष्ट्र देशातील पहिले राज्य : चंद्रशेखर बावनकुळे

पुणे (दै. संध्या)

‘लँड टायटलिंग ॲक्ट’ येत्या जुलै महिन्यात राज्यात लागू होणार असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेची मालमत्ता ही निश्चित प्रॉपर्टी म्हणून गणली जाणार असून जगातील कुठल्याही देशात ती कॅश करता येईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार भीमराव तापकीर, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई, कुलगुरू डॉ. विवेक साळवी यांच्यासह विद्यापीठाचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्री.बावनकुळे म्हणाले, स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात उभारलेले




भारती विद्यापीठाने गेल्या ६२ वर्षांत लाखो विद्यार्थी घडवून देश-विदेशात शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली असून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे कार्य पुढेही सुरू ठेवावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी भारती विद्यापीठाचे कार्यवाह आ. विश्वजीत कदम यांनी प्रास्ताविकात भारती विद्यापीठाचे मागच्या ६२ वर्षातील कारकिर्द, समाजिक योगदान, शैक्षणिक क्षेत्रात केलेले काम विशद केले. यावेळी जेष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई यांना दुसरा डॉ. पतंगराव कदम स्मृती पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याच बरोबर भारती विद्यापीठातील संशोधक, प्राध्यापक, कर्मचारी यांचाही विशेष गौरव करण्यात आला.

### शासनाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत दीड हजार कोटीचे करार

कार्य हे महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक आहे. ‘गल्लीतली शाळा’ ते भारती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण करून दाखवला. त्यांच्या विचारांचा प्रकाश आज देश-विदेशात पोहोचत आहे.

ते म्हणाले, शिक्षणाशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. तसेच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय)तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात विद्यापीठांनी तंत्रज्ञान आणि ए.आय. स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांसाठी कोणत्याही स्टॅम्प पेपरची आवश्यकता राहिलेली नसून विविध प्रमाणपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान’ अंतर्गत राज्यातील ३० लाख विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक कागदपत्रे मोफत पोहोचविण्याची व्यवस्था उभी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन हीच छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा असल्याचे सांगत सरकारने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असेही ते म्हणाले. नागपूर येथे भारती विद्यापीठाचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आवश्यक जागा व शासनस्तरीय सहकार्य देण्याची ग्वाही दिली. तसेच ‘टिटबिट पॉलिसी’च्या माध्यमातून अडचणीत असलेल्या भूखंडांचा मार्ग काढण्याबाबतही सकारात्मक भूमिका मांडली.

यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, “शिक्षणानेच माणसाची प्रगती होऊ शकते” हा संदेश देत पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची चळवळ उभी केली. त्याच ध्येयाने स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण क्षेत्रात वटवृक्ष उभा केला. एका छोट्या खोलीत सुरू झालेल्या शाळेचे आज जागतिक पातळीवरील विद्यापीठात रूपांतर झाले असून हे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी शिक्षणासोबत संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण, सैनिक प्रशिक्षण, विद्यार्थिनींसाठी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, शाळांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे यांसारख्या उपक्रमांवर शासन भर देत असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी शाळांबाबत बोलताना त्यांनी मराठी भाषेबद्दल केवळ भावना व्यक्त न करता प्रत्यक्ष कृतीची गरज असल्याचे नमूद केले. सामान्य व गरीब विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाचे शिक्षण देणारे मॉडेल तयार करण्याचे आवाहन त्यांनी भारती विद्यापीठाला केले.

# कॉर्पोरेट जिहाद व लव्ह जिहादच्या विरोधातील बेटी सुरक्षित, राष्ट्र सुरक्षित अभियानास प्रारंभ!

## कॉर्पोरेट जिहादचा मुद्दा संसदेत मांडून कंपन्यांसाठी नियम-अटी करणार! - राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी

पुणे (दै. संध्या)

केवळ ‘कॉर्पोरेट जिहाद’च नव्हे, तर जिथे संधी मिळेल, तिथे भारताचे अस्तित्व पोखरण्याचे आणि देशाचे लचके तोडण्याचे कारस्थान पद्धतशीर चालू आहे. आज ‘कॉर्पोरेट जिहाद’च्या माध्यमातून आपल्या तरुण पिढीच्या विचारसरणीवर आणि धर्मावर जे पद्धतशीर आक्रमण होत आहे, ते अत्यंत चिंताजनक आहे. यात केवळ प्रत्यक्ष गुन्हेगारांनाच नव्हे, तर त्यांना छुप्या पद्धतीने रसद पुरवणाऱ्या संपूर्ण यंत्रणेला आणि व्यवस्थेला कायद्याच्या चौकटीत आणून कठोर शासन करणे आवश्यक आहे. त्यासाठी हा ‘कॉर्पोरेट जिहाद’चा मुद्दा मी आगामी काळात संसदेत मांडणार आहे. कार्पोरेट आस्थापनांमधील वाढता जिहाद रोखण्यासाठी ही आस्थापने




भारतात येण्यापूर्वीच त्यांच्यावर काही बंधने, नियम अटी लागू करू शकतो का याद्दष्टीने विचार चालू आहे, असे स्पष्ट प्रतिपादन भाजपच्या राज्यसभेतील खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. ‘कॉर्पोरेट जिहाद’ आणि ‘लव्ह जिहाद’च्या विरोधात हिंदु जनजागृती समितीच्या वतीने ‘बेटी सुरक्षित, राष्ट्र सुरक्षित’ या अभियानाचा प्रारंभ पुण्यातून करण्यात आला. त्या प्रसंगी आयोजित ‘कॉर्पोरेट जिहाद’ नक्की सत्य काय ?’ या ‘विशेष संवादा’त त्या बोलत होत्या.

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेज ऑडिटोरियममध्ये आयोजित या कार्यक्रमाला समाजातील विविध स्तरांतील मान्यवरांसह कॉर्पोरेट क्षेत्रातील तरुण-तरुणींनी आणि पुणेकर नागरिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे आणि प्रसिद्ध लेखिका सौ. शेफाली वैद्य यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.या वेळी बोलतांना सौ. शेफाली वैद्य म्हणाल्या की, केवळ नाशिकमधील टीसीएस ही बहुराष्ट्रीय कंपनीच नव्हे, तर पब्लिक लिमिटेड कंपनी असलेल्या ‘लेन्सकार्ट’मध्ये ‘हिजाब, पगडी चालेल; मात्र कुंकू, टीळा, कलावा चालणार नाही’, असे उघडपणे हिंदूंशी भेदभाव करणारे संविधानविरोधी नियम बनवले गेले होते. तीव्र विरोध झाल्यावर हे नियम केवळ आठ दिवसांसाठीच शिथील केले होते; हा पण कॉर्पोरेट जिहादच आहे. मुसलमान वा अन्य धर्मीयांबाबतच्या प्रथा परंपरा चालतील; मात्र हिंदू धर्मातील प्रथा-परंपरा चालणार नाही हे शाळेपासूनची मानसिकता घेऊन हिंदू मोठा होतो. पुढे कॉर्पोरेट कल्चरमध्ये गेल्यावर बहुसंख्येने असूनसुद्धा हिंदू मुकाट्याने सर्व अन्यायकारक बंधने स्वीकारतो. भेदभाव सहन करतो. त्याची पुढची पायरी म्हणजे त्याला नाशिकमधील टीसीएस् कंपनीप्रमाणे अन्य धर्मीयांचे अत्याचार सहन करण्याची पाळी येते. अन्य धर्मीय ज्याप्रमाणे त्यांच्या प्रथा-परंपरा पाळण्यासाठी जागृत असतात. तसे हिंदूंनी स्वतःच्या धार्मिक अस्मितेसाठी कॉर्पोरेट जिहादच्या विरोधात जागृत होऊन संघटितपणे आवाज उठवला पाहिजे. तसे झाले, तर हिंदू समाज व हिंदू संघटना त्यांच्या मागे उभ्या राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आज समाजामध्ये घडणाऱ्या गंभीर घटना पाहता नराधमांना फाशीपेक्षाही कडक शासन करण्याची वेळ आली आहे; वर्ष ७११ मध्ये मोहम्मद बिन कासिमच्या आक्रमणापासून सुरू झालेले हे जिहादचे षड्यंत्र ‘लव्ह जिहाद’, ‘लँड जिहाद’ आणि ‘कॉर्पोरेट जिहाद’ अशा विविध रूपांत आजही सुरू असून, ‘गजवा-ए-हिंद’ आणि ‘व्हिजन २०४७’ च्या माध्यमातून भारताला इस्लामी राष्ट्र बनवण्याचे लिखित मनसुबे रचले जात आहेत. काश्मीरमधील हिंदूंचा नरसंहार, अजमेर सेक्स स्कँडल आणि केरळमधील मुख्यमंत्र्यांनी उघड केलेला ‘रोमिओ जिहाद’ यांसारख्या घटनांमागे मुसलमानांची लोकसंख्या वाढवणे, हिंदू डीएनए संपवणे आणि विकृत मानसिकता जोपासणे ही मुख्य कारणे असून या संकटाचा सामना करण्यासाठी हिंदूंमध्ये ‘स्वबोध’ आणि ‘शत्रुबोध’ होणे आवश्यक आहे.

पालकांनी पाल्यांशी संवाद वाढवून त्यांना हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व समजावणे आणि प्रत्येक मुलीच्या रक्षणाकरिता सर्वांनी एकजुटीने जनजागृतीचे अभियान राबवणे अनिवार्य आहे, असे प्रतिपादन समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी या प्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या लव्ह जिहाद आणि राष्ट्र-धर्मावरील ग्रंथ कक्षाला उपस्थितांनी मोठा प्रतिसाद दिला. कार्यक्रमाची सुरुवात शंखनादाने आणि मान्यवरांच्या सत्काराने झाली, तर शेवटच्या सत्रात उपस्थितांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

रणरागिणी शाखेच्या कु. क्रांती पेटकर यांनी सूत्रसंचालन केलेल्या या कार्यक्रमाची सांगता संपूर्ण ‘वन्दे मातरम्’ने करण्यात आली. या राष्ट्रव्यापी अभियानाच्या प्रारंभामुळे हिंदू समाजात एक नवा उत्साह संचारल्याचे पाहायला मिळाले. या कार्यक्रमाचे YouTube.com/@hindujagruti वरून थेट प्रक्षेपण करण्यात आले होते.